cmyk

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१५९ | शनिवार दि.२९ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नेपाळमधून २१ भारतीय सुखरूप दिल्लीत दाखल

दिल्ली: नेपाळमध्ये आलेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर काठमांडूमधून २१ भारतीय नागरिकांना सुखरूप भारतात आणण्यात आले आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी शुक्रवारी दिल्ली विमानतळावरील टर्मिनल-३ येथे या नागरिकांची भेट घेत त्यांचे कठीण परिस्थितीतील अनुभव जाणून घेतले. नेपाळी लष्कराने या भारतीय नागरिकांची कठीण परिस्थितीत सुटका करून त्यांना काठमांडू येथे पोहोचवले. त्यानंतर भारतीय दूतावासाने त्यांच्या भारतात परतण्याची व्यवस्था केली. जयशंकर यांनी सांगितले की, सर्वजण सुरक्षित असल्याचे पाहून मोठा दिलासा मिळाला. पूरानंतर हे नागरिक काठमांडूला पोहोचले होते आणि त्याच विमानाने त्यांना भारतात परत आणण्यात आले. नेपाळमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांशी संपर्क साधण्यावर सध्या भारताचा मुख्य भर आहे. सुमारे ३१५ भारतीयांशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. ही संख्या परिस्थितीनुसार बदलत आहे. दरम्यान, विविध ठिकाणांहून सुमारे ८५ भारतीयांची सुरक्षित सुटका करण्यात आली आहे.

### मी जरांगेला भाव देत नाही-विजय वटेट्टीवार

मुंबई : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा उपोषणाला बसत आहेत, त्याच पार्श्वभूमीवर मी जरांगेला भाव देत नाही, जरांगेने सरकारचे कपडे उतरवावे, सरकारने जरांगेचे कपडे उतरवावे. आम्हाला काही देणं घेणं नाही, आमच्या वाट्याचं देत असताना कुणालाही देऊ नये, असे विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटले. तसेच, ओबीसींच्या वाटचे घेऊ नये, द्यायचेच असेल तर तुम्ही जसे ईडब्लूएससाठी दहा टक्के आरक्षण न मागता वाढवून दिले. म्हणजेच ५०% ची मर्यादा ओलांडली. आता ६० टक्केवर गेली. पुन्हा ४०% वाढवा अ, ब, क, ड काढून टाका. जरांगेच्या नादाला लागायचा तो ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मात्र, ओबीसींच्या नादाला कोणी लागू नये, हा आमचा प्रश्न आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले. दरम्यान, ओबीसी प्रमाणपत्र असलेले खूप मराठा नेते आहेत. मात्र, आता बोलणे योग्य नाही, सध्या वातावरण गरम आहे. वातावरण थंड होऊ द्या सगळ्यांची नावे देतो, असेही वडेट्टीवार यांनी सांगितले.

### खांद्यावरुन वाहून नेता येणारी मिसाईल सिस्टीम भारत खरेदी करणार

दिल्ली: भारताने आपले लष्करी सामर्थ्य दृढ करण्यासाठी आणखी एक पाऊल उचलले आहे. भारत आता अमेरिकेकडून जॅव्हलिन अँटी-टँक गाईडेड मिसाईल सिस्टीम खरेदी करणार आहे. या मिसाईल सिस्टिमचे वैशिष्ट्ये म्हणजे ही सैनिकांना खांद्यावरुन कोठेही सहजपणे वाहून नेता येणार आहे. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी शुक्रवारी याची घोषणा केली. यामुळे भारत - अमेरिका यांच्यातील संरक्षण संबध अधिक दृढ होण्याचे संकेत आहेत. एफजीएम-१४८ जॅव्हलिन ही जगातील सर्वात प्रगत मॅन-पोर्टेबल (एका सैनिकाने खांद्यावरून डागता येणारी) फायर अँड फॉरगेट अँटी-टँक गाईडेड मिसाईल प्रणाली आहे. अमेरिकेतील लॉकहीड मार्टिन आणि रेथिऑन कंपन्यांनी संयुक्तपणे ती विकसित केली आहे. याचे वजन केवळ २२ किलो असते, त्यामुळे सैनिक सहजरित्या दुर्गम भागात ज्याठिकाणी इतर वाहने जाऊ शकत नाही तिथे ती नेऊ शकतो.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: १२१.५० क्विंटल** | | |
| २,४६० | २,७२१ | २,६२५ |
| **ज्वारी/हायब्रिड: ९०.०० क्विंटल** | | |
| २,१०० | ४,५०१ | ३,०२१ |
| **मका/लोकल: ८.०० क्विंटल** | | |
| २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| **तूर : १०.०० क्विंटल** | | |
| ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| **बाजरी: ८०.५० क्विंटल** | | |
| २,००० | २,८५० | २,५६९ |
| **मुग: ०.५० क्विंटल** | | |
| ८,८४० | ८,८४० | ८,८४० |
| **सोयाबीन: १९.५० क्विंटल** | | |
| ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| **हरभरा: ०.५० क्विंटल** | | |
| ५,७०१ | ५,७०१ | ५,७०१ |

# शेतकऱ्यांचा विरोध डावलून शक्तिपीठ महामार्गाचा मार्ग मोकळा!

## करवीरमधील १४ गावांत ९ सप्टेंबरपासून जमीन मोजणी
## सरकार माघार घेण्याच्या मन:स्थितीत नसल्याचे संकेत

कोल्हापूर । प्रतिनिधी

**शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांकडून तीव्र विरोध होत असतानाही राज्य सरकारने भूसंपादनाची प्रक्रिया पुढे रेटण्यास सुरुवात केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील १४ गावांतील जमिनींची मोजणी येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. यामुळे एकीकडे 'शक्तिपीठ महामार्ग नकोच' अशी भूमिका घेत शेतकरी आक्रमक होत असताना दुसरीकडे शासनाने जमीन मोजणीच्या नोटिसा बजावून प्रकल्पाबाबत माघार घेणार नसल्याचेच संकेत दिले आहेत.**

करवीर येथील भूमी उपअधीक्षक कार्यालयाकडून संबंधित शेतकऱ्यांना मोजणीच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध, आंदोलन आणि प्रकल्प रद्द करण्याच्या मागण्या सुरू असतानाही प्रशासनाने भूसंपादनाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकल्याचे स्पष्ट झाले आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी शासनाकडून प्रकल्पाची प्रक्रिया सुरूच ठेवली जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. या १४ गावांमधून महामार्गासाठी किती



जमीन संपादित केली जाणार, याची अंतिम आकडेवारी अद्याप स्पष्ट झालेली नाही. मात्र, प्रस्तावित भूसंपादनातील बहुतांश जमीन बागायती असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. आधीच या भागात कुटुंबाच्या वाटण्या आणि भाऊ हिस्स्यांमुळे जमिनीची दरडोई मालकी अत्यंत कमी झाली आहे. अशा परिस्थितीत उरलेली बागायती जमीनही महामार्गासाठी जाणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. गणेशवाडी (ता. करवीर) येथील भूसंपादनाच्या नोटिसांमधून या प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. गावातील ४२ सर्वेक्षण क्रमांक आणि गट क्रमांकांमधील प्रस्तावित भूसंपादन क्षेत्राची संयुक्त मोजणी करण्यात येणार आहे. ▶▶ पान २ वर

# मराठा समाजाला दिलासा; वंशावळ जुळवणी समित्यांना आणखी वर्षभराची मुदतवाढ

मुंबई । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील पुन्हा आंदोलनाची भूमिका घेत असतानाच राज्य सरकारने मराठा समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या वंशावळ जुळवणी प्रक्रियेला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रक्रियेतील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित समित्यांना अतिरिक्त वेळ मिळणार आहे.**




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या तालुका स्तरावरील वंशावळ जुळवणी समित्यांचा कार्यकाळ ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आला आहे. यापूर्वी या समित्यांचा कार्यकाळ ३० जून २०२६ रोजी संपला होता. मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी ▶▶ पान २ वर

# नेपाळमध्ये पुन्हा महाप्रलयाचं संकट

## बॅरियर लेक फुटण्याचा धोका? मृतांचा आकडा ६०० वर

काठमांडू । वृत्तसंस्था

नेपाळ आणि तिबेटच्या सीमा भागात आलेल्या विनाशकारी पुरामुळे मोठी जीवितहानी झाली. या आपत्तीतील मृतांचा आकडा ६०० वर पोहोचला आहे. तर १,४७३ लोक जखमी झाले असल्याची माहिती नेपाळ पोलिसांनी दिली. ▶▶ पान २ वर



### नेपाळने बचावकार्यासाठी मदत नाकारली

दरम्यान, नेपाळमध्ये शोध आणि बचावकार्यासाठी पथके पाठवण्याची तयारी अनेक देशांनी दर्शवली होती. पण नेपाळने मदत नाकारली आहे. आमची सुरक्षा यंत्रणा ही बचावकार्य हाताळण्यास सक्षम असल्याचे नेपाळ सरकारने म्हटले आहे. नेपाळ-चीन सीमेजवळ भोटेकोशी आणि त्रिशूली नदीच्या खोऱ्यांत बुधवारी अचानक भयंकर महाप्रलय आला. या महापुरामुळे सगळीकडे चिखल पसरला आहे.

# दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सुनावणी पूर्ण; न्यायालयाने निकाल राखून ठेवला



मुंबई । प्रतिनिधी


गेल्या सहा वर्षांपासून चर्चेत असलेल्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणातील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात पूर्ण झाली असून, दोन्ही बाजूंचे युक्तिवाद संपल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. न्यायाधीश कोतवाल यांनी या प्रकरणाचा निकाल राखून ठेवत लवकरच निर्णय दिला जाईल, असे संकेत दिले आहेत.

सुनावणीदरम्यान दिशा सालियन यांच्या मृत्यूनंतर झालेल्या दुखापती, चेहऱ्यावरील जखमा आणि पोस्टमॉर्टेम अहवालातील निष्कर्षांवर न्यायालयात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. १२ व्या मजल्यावरून पडल्याचा दावा असताना चेहऱ्याचा अत्यंत नाजूक भाग फ्रॅक्चर न होता केवळ दात फ्रॅक्चर कसे झाले, असा सवाल ▶▶ पान २ वर

# सोनिया गांधींच्या आत्मचरित्रावरून नवा वाद; प्रकाशनाबाबत 'पेंग्विन'ची भूमिका स्पष्ट

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या आगामी आत्मचरित्रावरून नवा वाद निर्माण झाला आहे. 'Belonging: A Journey of Love' ' या आत्मचरित्राच्या भारतातील प्रकाशनाबाबत पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने शुक्रवारी आपली भूमिका स्पष्ट केली. भारतात या पुस्तकाचा प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. काही आठवड्यांपूर्वी एका मीडिया रिपोर्टमध्ये




सोनिया गांधी यांनी पुस्तकातील काही संपादकीय बदल स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने प्रकाशनातून माघार घेतल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, कंपनीने हा दावा फेटाळून लावला आहे. पुस्तक प्रकाशित करण्याबाबत पेंग्विनने रस दाखवला होता आणि प्रकाशनाची तयारीही केली होती; मात्र लेखकाने काही बदल स्वीकारले नाहीत म्हणून प्रकाशकाने माघार घेतल्याचा दावा चुकीचा असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

पुस्तकाच्या प्रकाशन प्रक्रियेत लेखकाने दिलेल्या माहितीची तथ्य पडताळणी करणे तसेच आवश्यक त्या सूचना करणे हा प्रकाशकाच्या प्रक्रियेचा भाग असल्याचे पेंग्विनने स्पष्ट ▶▶ पान २ वर

# झेरॉक्स दुकानात साडेतीन हजार एसआयआर फॉर्म, भाजप कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल

## रोहित पवारांची निवडणूक आयोगाकडे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी



नवी मुंबई । प्रतिनिधी

जिल्ह्यातील खारघरमध्ये एसआयआर फॉर्मवरून राजकीय राडा झाल्याची घटना समोर आली आहे. एका झेरॉक्स दुकानात हजारो एसआयआर फॉर्म झेरॉक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दुकानात धाव घेतली. यावेळी हे फॉर्म झेरॉक्ससाठी घेऊन आलेला व्यक्ती भाजपचा युवा पदाधिकारी असल्याचे समोर आले. याप्रकरणी, ४ बीएलओंना निलंबित करण्यात आले असून, पोलिसांनी गुन्हा देखील ▶▶ पान २ वर

# औषध निरीक्षक भरतीचा पेपर मिळवण्यासाठी मोजले ५० लाख?

## ऋतुजा पाटीलचे नवे व्हॉट्सअप चॅट समोर




नुकतेच एमपीएससीचा औषध निरीक्षक भरतीचा पेपर फुटल्याने राज्यात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. या प्रकरणातील आरोपी ऋतुजा पाटीलचे अनेक चॅट सध्या व्हायरल होत असून, आता नवे व्हॉट्स ॲप चॅट समोर आले आहेत. या नव्या चॅटमध्ये पेपर फोडण्यासाठी तब्बल ५० लाख रूपये मोजल्याचा दावा केला जात आहे. ▶▶ पान २ वर

# ५३ हजार लाडक्या बहिणींचा जुलैचा हप्ता रखडला

मुंबई । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी आणि ई-केवायसी प्रक्रियेनंतर अनेक महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता 'ओवाळणी' म्हणून वितरित केला जात आहे. मात्र, विविध कारणांमुळे सुमारे ५३ हजार ६३७ महिलांना जुलै महिन्याचा हप्ता मिळणार नसल्याचे माहिती समोर आले आहे. यामध्ये ६५ वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या महिलांची संख्या मोठी आहे.**



राज्य सरकारने जून २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. योजनेच्या सुरुवातीला लाभार्थी महिलांची संख्या मोठी होती. मात्र, त्यानंतर आधार प्रमाणीकरण, ई-केवायसी, उत्पन्नाची अट, कुटुंबातील शासकीय कर्मचारी, इतर शासकीय योजनांचा लाभ तसेच योजनेतील इतर पात्रता निकषांची पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर लाभार्थी अपात्र ठरले. एकूण २ कोटी ४८ लाख महिलांनी योजनेसाठी अर्ज केले होते. त्यापैकी एप्रिल अखेर सुमारे ९२ लाख नोंदी अपात्र ठरवण्यात आल्या. त्यामुळे योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची संख्या सुमारे १.६५ कोटींवर आली आहे. तर रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर २५ ऑगस्टपासून जुलै महिन्याच्या हप्त्याचे वितरण सुरू करण्यात आले. सामाजिक न्याय विभाग आणि वित्त विभागाकडून उपलब्ध झालेल्या निधीतून लाभार्थी महिलांच्या खात्यांमध्ये गुरुवारी ▶▶ पान २ वर

### एनटीए मध्ये मोठा फेरबदल! अधिकाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी

दिल्ली । वृतसंस्था

राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीए मध्ये केंद्र सरकारने दोन संचालक आणि एका संयुक्त संचालकाची नियुक्ती केली आहे. कार्मिक मंत्रालयाने २७ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या स्वतंत्र आदेशानुसार रवि कुमार सिंह आणि प्रसन्ना वेंकटेश व्ही. यांची संचालकपदी, तर अमित समदरिया यांची संयुक्त संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रवि कुमार सिंह हे २०१२ बॅचचे भारतीय पोलीस सेवा ( आयपीएस ) अधिकारी असून अरुणाचल प्रदेश-गोवा-मिझोराम-केंद्रशासित प्रदेश कॅडरचे आहेत. नागरी सेवा परीक्षेतून त्यांची थेट आयपीएस मध्ये निवड झाली. एनटीए मध्ये येण्यापूर्वी ते दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत डीसीपी म्हणून कार्यरत होते. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# न्यायमूर्ती, तुम्हीसुद्धा?

न्यायव्यवस्था ही लोकशाहीच्या मंदिरातील शेवटची आशा मानली जाते. सरकार चुकले, प्रशासन ढिम्म झाले, राजकीय व्यवस्था स्वार्थात अडकली, तरी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला की न्याय मिळेल, असा सामान्य नागरिकाचा विश्वास असतो. हा विश्वास केवळ कायद्याच्या पुस्तकांवर टिकलेला नसतो; तो न्यायमूर्तींच्या चारित्र्यावर, प्रामाणिकपणावर आणि निष्पक्षतेवर टिकलेला असतो. म्हणूनच एखाद्या न्यायमूर्तींवर गैरव्यवहाराचे गंभीर आरोप झाले की ते केवळ एका व्यक्तीपुरते प्रकरण राहत नाही. त्याची झळ थेट संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेला बसते.

दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी कथितरीत्या मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याच्या प्रकरणाने देशभर खळबळ उडवली. त्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती स्थापन झाली. समितीने गंभीर स्वरूपाचे निष्कर्ष नोंदवल्याचे समोर आले. पुढे न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरोधात महाभियोगाची प्रक्रिया सुरू करण्याची वेळ आली. या सगळ्या घटनाक्रमाने एक अस्वस्थ करणारा प्रश्न देशासमोर उभा केला आहे. न्याय देणाऱ्यांच्या नैतिकतेची कसोटी कोण घेणार? न्यायालयाने राजकीय सत्तेवर अंकुश ठेवायचा, प्रशासनाला जबाबदार धरायचे आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करायचे. पण न्याय व्यवस्थेतीलच एखाद्या घटकावर भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहाराचा आरोप झाला, तर त्या आरोपांची चौकशी किती पारदर्शकपणे होते, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण न्यायालयीन स्वायत्तता म्हणजे न्यायमूर्तींना अमर्यादित संरक्षण नव्हे. स्वायत्तता आणि उत्तरदायित्व यांचा समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे. या प्रकरणात आणखी चिंताजनक बाब म्हणजे अशा आरोपांवर तत्काळ आणि स्पष्ट उत्तर मिळण्याऐवजी अनेकदा प्रक्रियेच्या पडद्याआड प्रश्न लांबणीवर पडतात. सामान्य नागरिकावर भ्रष्टाचाराचा संशय आला तर तपास यंत्रणा क्षणार्धात सक्रिय होते. सरकारी कर्मचाऱ्यावर आरोप झाला तर निलंबन, चौकशी, गुन्हा अशा कारवाया झपाट्याने होतात. मग न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तींबाबत निकष वेगळे का असावेत? कायद्यापुढे सर्व समान असतील, तर न्यायमूर्तीही त्याला अपवाद कसे?

न्यायमूर्ती वर्मा प्रकरणातील आरोप सिद्ध झाले आहेत, असे गृहीत धरून निष्कर्ष काढणे योग्य नाही. आरोप, चौकशी आणि अंतिम निर्णय यांच्यातील फरक लोकशाहीने विसरता कामा नये. पण आरोप गंभीर असतील, चौकशी समितीने गंभीर निरीक्षणे नोंदवली असतील आणि संसदेत महाभियोगाची प्रक्रिया सुरु झाली असेल, तर या संपूर्ण प्रक्रियेबाबत जनतेला पारदर्शक माहिती मिळणे आवश्यक आहे. कारण न्याय केवळ झाला पाहिजे असे नाही; तो होताना दिसलाही पाहिजे. न्यायालयीन विलंब, प्रलंबित खटले, महागडी न्यायप्रक्रिया आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवताना येणाऱ्या अडचणी यामुळे आधीच न्यायव्यवस्थेबद्दल अस्वस्थता आहे. त्यात न्यायमूर्तींच्या आचरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले तर परिस्थिती अधिक गंभीर होते. न्यायालयाचा आदेश नागरिक मानतो कारण त्यामागे केवळ कायद्याची ताकद नसते; त्यामागे न्यायाधीशांच्या निष्कलंक प्रतिमेची नैतिक ताकद असते. राजकारण्यांवर आरोप झाले की जनता प्रश्न विचारते. अधिकाऱ्यांवर आरोप झाले की माध्यमे प्रश्न विचारतात. उद्योगपतींवर आरोप झाले की तपास यंत्रणा प्रश्न विचारते. मग न्यायमूर्तींवर गंभीर आरोप झाले की प्रश्न विचारणे हे न्यायालयाचा अवमान ठरू नये. उलट, न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा वाचवायची असेल तर प्रश्न विचारण्याची मुभा अधिक असली पाहिजे. कारण लोकशाहीत कोणतीही संस्था प्रश्नांच्या पलीकडे नसते. संसदेला जनतेसमोर उत्तर द्यावे लागते, सरकारला द्यावे लागते, प्रशासनाला द्यावे लागते. मग न्यायव्यवस्थेलाही आपल्या संस्थात्मक शुचितेबाबत उत्तरदायी राहावेच लागेल. आजचा प्रश्न न्यायमूर्ती वर्मा यांच्यापुरता मर्यादित नाही. प्रश्न आहे—न्यायाच्या आसनावर बसलेल्या व्यक्तीच्या नैतिकतेवर संशय निर्माण झाला तर त्या आसनाची प्रतिष्ठा कोण जपणार? न्यायालयाच्या हातात इतरांना न्याय देण्याचा अधिकार आहे. पण त्या अधिकारासोबत स्वतःच्या आचरणाची कठोर तपासणी स्वीकारण्याची जबाबदारीही आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पट्टी असते; पण न्यायमूर्तींच्या आचरणावर पडदा असता कामा नये. म्हणूनच हा सवाल केवळ एका न्यायमूर्तींना नाही, न्यायव्यवस्थेलाच आहे ; न्यायमूर्ती, तुम्हीसुद्धा.?

# जनहिताच्या प्रकल्पांना तातडीने निधी द्या; वाढती गुन्हेगारी, मटका-गुटख्यावर कारवाई करा-खा. डॉ. कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

**जालना शहर व जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधत खा.डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्याचे स्वतंत्र निवेदने देऊन तातडीने आवश्यक प्रशासकीय व निधीची तरतूद करण्याची मागणी केली आहे. तसेच जालना जिल्ह्यात गुटखा मटका सुरू असल्याची माहिती समोर आल्यामुळे सदरील धंदे बंद करण्यात यावे.औद्योगिक प्रदूषण, जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेचा विकास, हातवन बृहत्? लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी भूसंपादन, घाणेवाडी तलावाची दुरुस्ती तसेच शेतकरी कर्जमाफी यासारख्या प्रश्नांकडे खा. डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले असल्याची माहिती जालना येथे जिल्हा काँग्रेस कार्यालयामध्ये डॉ. कल्याण काळे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.**



जालना शहर व परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वायू, जल व ध्वनी प्रदूषणाची समस्या गंभीर होत असल्याचे खासदार काळे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. एमआयडीसी परिसरातील गावांमध्ये नागरिकांना धूर, धुळीचे कण, पाण्याच्या गुणवत्तेच्या तक्रारी तसेच श्वसनासंबंधी त्रास होत असल्याने स्वतंत्र व सखोल प्रदूषण तपासणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. औद्योगिक आस्थापनांचे विशेष ऑडिट करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करावी, स्टील कारखान्यामुळे प्रदूषण होत असल्यामुळे कॅन्सर चे प्रमाण वाढले आहे. तसेच सांडपाण्याची नियमित तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या प्रलंबित बांधकामांना गती देऊन आवश्यक मनुष्यबळ व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी कार्यरत शिक्षकांना कायमस्वरूपी पदस्थापना, स्वतंत्र नोंदणी/ आस्थापना व्यवस्था, पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी व मनुष्यबळ देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, जालना तालुका व जिल्ह्यातील हातवन बृहत्? लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही गतीने पूर्ण करून प्रकल्पाच्या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यास त्याचा फायदा जालना शहरासह परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा मिळून शेतकऱ्यांना दीर्घकालीन लाभ होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या घाणेवाडी तलावाच्या सांडव्यांची तातडीने दुरुस्ती करावी आणि तलावातील गाळ काढण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही खासदार काळे यांनी केली आहे. सांडव्यांच्या भिंतींमध्ये गंभीर स्वरूपाच्या भेगा पडल्याने भविष्यात धोका निर्माण होण्याची शक्यता असून, अतिवृष्टी झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तलावातील गाळ साचल्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी झाली असून गाळ काढल्यास शहराच्या पाणीपुरवठ्याला मोठा फायदा होईल, असेही त्यांनी म्हटले आहे. यासोबतच राज्यातील पात्र शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अधिक सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. ३१ मार्च २०१९ पूर्वीची पात्र थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांचा योजनेंतर्गत समावेश करावा, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रोत्साहनपर लाभाची कमाल मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवावी, जमीन वर्ग-२च्या कारणामुळे पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नयेत, तसेच कागदपत्रे व ओळख क्रमांकाच्या तांत्रिक अडचणींमुळे कोणताही पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. या सर्व प्रश्नांवर मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागांना तातडीने निर्देश देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि प्रलंबित कामांना गती द्यावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. सदरील पत्रकार परिषदेला श्री राजेंद्र राख, जालना पीपल्स बँकेचे मा. चेअरमन संजय मुथा,बदरभाई चाऊस,नंदू भैया जांगडे,कृष्णा पा.पडूळ,नरेंद्र मित्तल,सुनील चौधरी,अब्दुल हाफिज,संजय इंगळे,शेख वासिम,अशोकराव उबाळे,राजेंद्र गोरे,अविनाश चव्हाण,रघुवीर गुढे,सोपान तिरुखे,ज्ञानदेव इंगोले,वासिम पठाण,भागवत घाटे,कलीम खान,कल्याण तारडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत

दोष न देता ध्येय निश्चित करून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मोठी झेप घ्यावी,असा संदेश त्यांच्या यशातून मिळत असल्याचेही मोहनराव जगताप यांनी सांगितले. या सत्कार समारंभास माजलगाव नगरपरिषदेचे गटनेते इम्रान आगाखान, नगरसेवक शरद यादव,नगरसेवक भागवतराव भोसले, नगरसेवक गोविंद ईतापे,रविंद्र सोनवलकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष संतोषराव काटकर पारगावकर तसेच दोन्ही गुणवंत विद्यार्थिनींचे पालक उपस्थित होते.

---------

### पाटोदा शहरातील शाळा

महाविद्यालय, जय भवानी महाविद्यालय, संत बाळूदेव विद्यालय, वसंतराव नाईक विद्यालय, भामेश्वर विद्यालय, संत तुकाराम महाराज विद्यालय आणि प्रियदर्शनी कन्या प्रशाला या शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्य व मुख्याध्यापकांच्या स्वाक्षऱ्या व अधिकृत शिक्के आहेत.

---------

### रक्षाबंधनाची अनोखी

सन्मानाने परत करण्यात आले. सणाच्या तोंडावर आपले कष्टाचे दागिने परत मिळाल्याने महिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

**चकलंबा पोलीस ठाणे:**

चकलंबा पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले सुमारे २ लाख ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तक्रारदारास परत करण्यात आले.

**गेवराई पोलीस ठाणे:**

गेवराई पोलिसांनी ४ महत्त्वाचे मौल्यवान मुद्देमाल मूळ मालकांना परत केले. याशिवाय नागरिकांचे हरवलेले १० महागडे मोबाईल फोन शोधून काढून ते संबंधितांच्या स्वाधीन केले.

**माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे:**

न्यायालयाच्या आदेशानुसार ३२ हजार रुपये किमतीचा जप्त मुद्देमाल तक्रारदारास सुपूर्द करण्यात आला.

**नागरिकांकडून पोलिसांचे आभार**

सण-उत्सवाच्या काळात आपली चोरीस गेलेली किंवा हरवलेली मालमत्ता पुन्हा हातात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत बीड पोलिसांचे मनापासून आभार मानले. बीड पोलिसांच्या या संवेदनशील आणि तत्पर उपक्रमाचे सर्व स्तरातून मोठे कौतुक होत आहे.

---------

### लोकनेते सुंदरराव सोळंके

मार्गदर्शन प्रेरणादायी ठरणार आहे. संस्थेच्या या यशामागे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके यांच्यासह सर्व कर्मचारी वर्गाचे नियोजनबद्ध आणि मेहनती योगदान असल्याचे चेअरमन वीरेंद्र प्रकाश सोळंके यांनी नमूद केले. सभासदांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत राहून संस्थेची प्रगती आणखी उंचावण्यासाठी सर्वांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक होत असून, मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके आणि सर्व कर्मचारी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. भविष्यातही सभासदांचा विश्वास कायम ठेवत संस्थेची आर्थिक वाटचाल अधिक सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---------

### गोरक्षनाथ टेकडी येथे सप्ताह

**महाप्रसादाच्या महापंक्ती.......**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह काल्याच्या कीर्तनानंतर भाविक भक्तांच्या महाप्रसादाच्या महापंगती उठवण्यात आल्या.यावेळी ६१ क्विंटल बुंदीच्या प्रसादाचे पिकपच्या साह्याने स्वयंसेवकांनी महाप्रसादाचे वाटप केले .

**चोख पोलीस बंदोबस्त.....**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे लाखोचा उपस्थित असताना बीड व पिंपळनेर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.

---------

### आ. सुरेश धस यांचा

राधाकृष्णजी विखे पाटील साहेब, जलसंपदा विभागाचे सचिव तसेच अर्थ व नियोजन विभागातील संबंधित अधिकारी यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले आहेत. तसेच या प्रक्रियेत जलसंपदा विभाग, गोदावरी पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप मॅडम, कार्यकारी अभियंता नखाते साहेब, उपअभियंता पाखरे साहेब व सिनारे साहेब यांचेही मोलाचे योगदान लाभले असल्याची भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली आहे.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा विरोध डावलून

संबंधित जमीनधारक किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सकाळी साडेनऊ वाजता प्रत्यक्ष जागेवर उपस्थित राहून जमिनीचे सीमांकन दाखवावे, असे प्रशासनाने कळविले आहे. संयुक्त मोजणीच्या वेळी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), भूसंपादन मंडळ तसेच जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. जमीनधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी गैरहजर राहिल्यास संयुक्त मोजणीची आवश्यकता नसल्याचे गृहीत धरून प्रकरण कार्यवाहीविना निकाली काढले जाऊ शकते. त्यानंतर पुन्हा मोजणीसाठी शुल्क भरावे लागू शकते, असा इशाराही नोटिसीत देण्यात आला आहे. शक्तिपीठ महामार्गामुळे बागायती आणि सुपीक जमीन जाणार असल्याने संबंधित शेतकऱ्यांकडून सुरुवातीपासूनच विरोध केला जात आहे. प्रकल्पाची गरज, मार्ग आणि भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांच्या आक्षेपांकडे शासनाने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी होत आहे. मात्र, शेतकरी प्रकल्पाला विरोध करत असतानाच जमीन मोजणीच्या नोटिसा बजावण्यात आल्याने 'शेतकऱ्यांचा विरोध एका बाजूला आणि सरकारची प्रकल्प रेटण्याची भूमिका दुसऱ्या बाजूला' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जमिनीची मोजणी सुरू झाल्याने आता भूसंपादनाची प्रक्रिया प्रत्यक्षात पुढे जाणार असल्याने शेतकऱ्यांचा विरोध आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे करवीर तालुक्यातील या मोजणीला केवळ प्रशासकीय प्रक्रिया न मानता शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधातील शेतकरी आंदोलनाची पुढील दिशा ठरविणारा महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले जात आहे.

-----------

### नेपाळमध्ये पुन्हा महाप्रलयाचं

शेकडो लोक अजूनही बेपत्ता आहेत. तर अचानक आलेल्या या पुरामुळे नेपाळ- चीन सीमेजवळ तयार झालेले एक मोठे जलाशय (बॅरियर लेक) फुटण्याचा धोका निर्माण झाला असून, यामुळे पुन्हा एकदा महाप्रलय येण्याची शक्यत व्यक्त होत आहे. हे जलाशय तुडुंब भरून वाहू लागल्याने नेपाळ आणि चीन या दोन्ही देशांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. माती, दगडांचा ढिगारा साचून तयार झालेला हा जलाशय फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे बचावकार्य थांबवण्यात आले होते. पण शुक्रवारी दुपारपर्यंत परिस्थिती नियंत्रणात आल्याचे चीनच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. यामुळे बचावकार्ये पुन्हा सुरू करण्यात आले. रसुवा ते चितवन दरम्यानच्या नदीकाठी आणि बाधित भागांत शोधकार्यासाठी १,२०० जणांचे एक पथक तैनात करण्यात आले आहे. येथील पूरपरिस्थितीची अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत देखरेख वाढवली आहे. जलाशयातील पाण्याचा प्रवाह वेगाने वाढल्याने सखल भागांमध्ये अचानक पूर येण्याची शक्यता आहे. पुराचा धोका लक्षात घेऊन सखल भागांतील नागरिक उंच ठिकाणी स्थलांतर करत आहेत. अद्याप ९५० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. यात ५०० हून अधिक परदेशी नागरिकांचा समावेश आहे. त्यांचा शोध घेतला जात आहे. या ठिकाणी बचावकार्य सुरू आहे.

---------------

### मराठा समाजाला दिलासा; वंशावळ

आणि कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देताना उपलब्ध पुराव्यांची वैधानिक तसेच प्रशासकीय पातळीवर तपासणी केली जाते. त्यासाठी २५ जानेवारी २०२४ रोजी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली होती. संबंधित समित्यांकडून वंशावळ जुळवणी करून पात्र व्यक्तींच्या जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाते. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये वंशावळ जुळवणीची अनेक प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याने समित्यांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यानुसार शासनाने १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ या कालावधीसाठी समित्यांना एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. यापूर्वीच्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी या मुदतवाढीच्या कालावधीतही लागू राहणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मराठा आरक्षण आणि कुणबी नोंदीच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील आंदोलनाची भूमिका घेत असताना सरकारकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे वंशावळ जुळवणीची प्रकरणे प्रलंबित असलेल्या मराठा समाजातील पात्र नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. समित्यांना आणखी एक वर्षाचा कालावधी मिळाल्याने प्रलंबित वंशावळ जुळवणी प्रकरणांची तपासणी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला पुरेसा वेळ मिळणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-----------------

### सोनिया गांधींच्या आत्मचरित्रावरून नवा

केले. ही केवळ प्रकाशकाची जबाबदारी नसून त्याचा अधिकारही असल्याचे कंपनीने नमूद केले आहे. सोनिया गांधी यांच्यासोबत झालेल्या गोपनीय चर्चेवर अधिक भाष्य करण्यास मात्र कंपनीने नकार दिला. दरम्यान, अमेरिकेतील अश्रषीशव अ. घपेषि यांनी यापूर्वी ': मइशश्रेपसळपस: अ गेीीपशू ष डेींशफ' हे पुस्तक १० नोव्हेंबर रोजी प्रकाशित होणार असल्याची घोषणा केली आहे. मात्र, भारतात या पुस्तकाचे प्रकाशन आणि वितरण नेमके कोण करणार, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर पुस्तकाची ई-बुक आवृत्ती २,६१५ रुपयांना प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध असल्याचे दिसत आहे. ७९ वर्षीय सोनिया गांधी यांच्या आयुष्यातील अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा वेध या आत्मचरित्रातून घेतला जाणार आहे. इटलीतील बालपणापासून भारतात येण्यामागील प्रेमकहाणी, शक्तिशाली गांधी कुटुंबात झालेला विवाह आणि पती राजीव गांधी यांच्या निधनानंतरचा संघर्ष याबाबत त्या या पुस्तकातून आठवणी मांडणार आहेत. राजीव गांधी यांच्या हत्येनंतरचा काळ, त्यानंतर सोनिया गांधी यांचा सक्रिय राजकारणात झालेला प्रवेश आणि २००४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारण्यास त्यांनी दिलेला नकार यांसारख्या राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण घटनांवरही पुस्तकात प्रकाश टाकण्यात येणार आहे. प्रकाशकाच्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांच्या आयुष्यातील प्रेम, वैयक्तिक संघर्ष, शोकांतिका आणि त्यानंतरचा भारतीय राजकारणातील प्रवास असा विस्तृत पट या आत्मचरित्रातून उलगडणार आहे. त्यामुळे पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच त्याबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, भारतातील प्रकाशनाची जबाबदारी कोणत्या प्रकाशकाकडे जाणार, याकडेही लक्ष लागले आहे.

-------------

### दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सुनावणी

न्यायालयाने उपस्थित केला. यावर सरकारी वकील शिशिर हिरे यांनी पोस्टमॉर्टेम अहवालाचा संदर्भ देत दिशा सालियन समोरच्या बाजूने पडल्या होत्या आणि जमिनीवर आदळताना पहिला आघात दातांवर झाल्याने ते फ्रॅक्चर झाले, असा युक्तिवाद केला. मात्र, इतक्या मोठ्या उंचीवरून पडल्याने झालेल्या तीव्र आघातात चेहऱ्याचा नाजूक भाग फ्रॅक्चर का झाला नाही, असा प्रश्न न्यायालयाने पुन्हा उपस्थित केला. दरम्यान, तपास पुन्हा सुरू झाल्यानंतर १५ जानेवारी २०२४ रोजी दिशा सालियन यांच्या वडिलांचा जबाब नोंदवण्यात आल्याचे सरकारी वकील हिरे यांनी न्यायालयाला सांगितले. एका व्यवहाराशी संबंधित कराराची प्रक्रिया रद्द झाल्यानंतर दिशा सालियन नैराश्यात गेल्या होत्या आणि त्यातून त्यांनी आत्महत्या केल्याचे त्यांच्या वडिलांनी जबाबात म्हटल्याचा दावा सरकारी पक्षाने केला. सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, दिशा सालियन यांच्या वडिलांनी आपल्या जबाबात, ''आमची आदित्य ठाकरे यांच्याशी कधीही भेट झालेली नाही आणि मी पूर्ण शुद्धीत हा जबाब देत आहे,'' असे म्हटले आहे. दिशा सालियन यांच्या आई-वडिलांनी दंडाधिकाऱ्यांसमोरही जबाब नोंदवला असून, त्यात कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितल्याचा युक्तिवादही सरकारी पक्षाने केला. सुनावणीदरम्यान दिशा सालियन यांच्यासोबत राहणारे रोहन राय यांच्या जबाबाचाही सरकारी वकील हिरे यांनी संदर्भ दिला. दिशा सालियन यांच्या हिताची आणि त्यांच्या कल्याणाची सर्वाधिक चिंता असलेल्या व्यक्तींमध्ये रोहन राय यांचे स्थान महत्त्वाचे असल्याचे सरकारी पक्षाने नमूद केले. तपासादरम्यान सर्वप्रथम रोहन राय यांचा जबाब नोंदवण्यात आल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. सरकारी वकिलांच्या युक्तिवादानुसार, लॉकडाऊनच्या काळात रोहन राय दिशा सालियन यांच्यासोबत राहत होते. त्यांच्या जबाबात दिशा आणि त्यांच्या वडिलांमध्ये वाद झाला होता तसेच घटनेपूर्वी तीन महिन्यांपासून दोघांमध्ये संवाद नव्हता, असे नमूद करण्यात आले होते. रोहन राय यांनी कोणत्याही घातपाताची शक्यता नाकारली असून, दिशा सालियन या तीव्र तणावाखाली असल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे म्हटल्याचा दावा सरकारी पक्षाने केला. दिशा सालियन यांच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे कोणतेही पुरावे वैद्यकीय अहवालात आढळले नसल्याचा दावा सरकारी पक्षाने केला. या प्रकरणात डॉक्टरांचा सीआरपीसी कलम १६४ अंतर्गत जबाब नोंदवण्यात आल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. दिशा सालियन यांचे पोस्टमॉर्टेम करणारे डॉ. जाधव यांच्या जबाबाचा संदर्भ देत, लैंगिक अत्याचाराचे कोणतेही पुरावे नसल्याचे सरकारी वकिलांनी म्हटले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायाधीश कोतवाल यांनी प्रकरणाचा निकाल राखून ठेवला आहे. त्यामुळे गेल्या सहा वर्षांपासून चर्चेत आणि राजकीय वर्तुळातही गाजत असलेल्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**याचे राजकिय भांडवल करता येणार नाही**

''सहा वर्षांनंतर या प्रकरणाचे राजकीय भांडवल करता येणार नाही,'' असा युक्तिवादही सरकारी वकील शिशिर हिरे यांनी न्यायालयात केला. व्यक्तींमध्ये मतभेद असू शकतात, मात्र प्रत्येक मतभेदातून गुन्हेगारी स्वरूपाचा प्रकार सिद्ध होत नाही, असेही त्यांनी नमूद केले. या प्रकरणात तक्रारी किंवा हरकती असल्यास पुढे येण्यासाठी जाहिरातही देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर कोणतीही व्यक्ती तक्रार घेऊन पुढे आली नसल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले.

-----------

### औषध निरीक्षक भरतीचा पेपर

औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर परीक्षेआधीच मिळवण्यासाठी ५० लाख रूपये भरले आहेत असे ऋतुजा या चॅटमध्ये सांगत असल्याचे दिसून आले आहे. एमपीएससी औषध निरीक्षक भरती परीक्षेचा पेपर फुटला. त्याच्या चौकशीत ५ लाख रूपये देण्यात आल्याची बाब समोर आली होती. मात्र आता ऋतुराजाच्या नव्या लीक चॅटमध्ये ५० लाख रूपयांचा दावा केल्याने एकच खळबळ उडाली आहे. एमपीएससीतील तीन अधिकारी सध्या गुन्हे शाखेच्या अटकेत असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. मात्र आता ऋतुजाचे नवे चॅट समोर आले अन् पेपरफुटीमध्ये पैशाचा मोठा खेळ झाल्याची शंका व्यक्त केली जाऊ लागली आहे. आकडा ऐकून सर्वांच्याच भूवया उंचावल्या आहेत. आता पेपर फक्त ५ लाखात फुटला की त्याची आणखी मोठी रक्कम ऋतुजाच्या वडिलांनी मोजली याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

----------------

### झेरॉक्स दुकानात साडेतीन हजार एसआयआर

दाखल केला आहे. मात्र, यात केवळ बीएलओंना निलंबित करून भागणार नाही, तर त्यांना आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. खारघरमधील एका झेरॉक्स दुकानात हजारो एसआयआर फॉर्म झेरॉक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दुकानात धाव घेतली. त्यावेळी, ठाकरे गट आणि भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये झटापट झाली. खारघर पोलीस या प्रकरणाची दखल घेत नसल्याने पोलीस ठाण्यात ठाकरे गटाने ठिय्या आंदोलन केले. अखेर भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पाच बीएलओ प्रतिनिधींना रायगड जिल्हाधिकारी यांनी निलंबित केले आहे. भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्याकडून ३५ हजार एसआयआर अर्ज ताब्यात घेवून सील करण्यात आले आहेत. त्यांना आदेश देणारे अधिकार कोण आहेत? तेही निलंबित झाले पाहिजेत आणि भाजप कार्यकर्त्यावरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केली. महत्त्वाचे म्हणजे जागरुक नागरिकांमुळं हा प्रकार उघडकीस आला म्हणून लाजेखातर ही कारवाई केली असेल, पण असे अनेक प्रकार जे उघड झालेले नाहीत त्याचे काय? हाही प्रश्न आहे आणि निवडणूक आयोगाने याचं उत्तर दिले पाहिजे, अशी मागणीही रोहित पवारांनी केली.

-----------

### ५३ हजार लाडक्या बहिणींचा

सायंकाळपर्यंत राज्यातील १ कोटी ४१ लाख ८५ हजार खात्यांमध्ये सुमारे २ हजार ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. मात्र ६५ वर्षांची वयोमर्यादा ओलांडलेल्या महिलांना यापुढे योजनेचा लाभ घेता येणार नाही. परिणामी सुमारे ५३ हजार ६३७ महिलांना जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, योजना सुरू झाल्यानंतर आलेल्या पहिल्या रक्षाबंधनाच्या काळात सरकारने एकाच वेळी तीन महिन्यांचे म्हणजेच ४,५०० रुपयांचे अनुदान महिलांच्या खात्यांमध्ये जमा केले होते. या रकमेचा सरकारकडून 'रक्षाबंधणाची ओवाळणी' म्हणून प्रचार करण्यात आला होता. यंदाही रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता 'ओवाळणी' म्हणून दिला जात आहे.

----------

### एनटीए मध्ये मोठा फेरबदल!

सप्टेंबर २०१२मध्ये सेवेत दाखल झालेले सिंह यांना सुमारे १४ वर्षांचा अनुभव आहे. प्रसन्ना वेंकटेश व्ही. हे २०१२ बॅचचे आंध्र प्रदेश कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत. तमिळनाडू कृषी विद्यापीठातून त्यांनी कृषी विषयातील पदवी घेतली आहे. त्यांनी एलुरूचे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, विजयवाड्याचे महापालिका आयुक्त आणि कुर्नूलचे संयुक्त जिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. एनटीए मध्ये नियुक्तीपूर्वी ते गुंटूर येथे सामाजिक कल्याण विभागाचे सचिव होते. अमित समदरिया हे २०१६ बॅचचे भारतीय महसूल सेवा अधिकारी असून कस्टम्स अँड इनडायरेक्ट टॅक्सेस कॅडरचे आहेत. आयआयटी दिल्लीमधून त्यांनी मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले आहे. एनटीए मध्ये येण्यापूर्वी ते दिल्ली मुख्यालयातील जीएसटी इंटेलिजन्स महासंचालनालयात संयुक्त आयुक्त होते. मे २०२६मध्ये त्यांची डेप्युटी कमिशनर पदावरून संयुक्त आयुक्तपदी पदोन्नती झाली.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६
३

# क्रांतीच्या मशालीचा वारसदार

# डॉ.राजेश इंगोले




## फुले-आंबेडकरी विचारांचा सच्चा पाईक, बुद्धाच्या करुणेचा उपासक आणि माणुसकीच्या लढ्याचा योद्धा

**काही माणसं जन्माला येतात आणि काळाच्या गर्दीत हरवून जातात; पण काही माणसं जन्माला येतात ती काळाच्या कपाळावर आपल्या कर्तृत्वाची अक्षरं कोरण्यासाठी! काहींचं आयुष्य स्वतःपुरतं असतं, तर काहींचं आयुष्य हजारो वंचितांच्या, उपेक्षितांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि गरिबांच्या डोळ्यांतील स्वप्नांना आकार देण्यासाठी खर्ची पडतं. अशा माणसांच्या जीवनाचा इतिहास लिहिताना शाई अपुरी पडते आणि शब्द खुजे ठरतात.आदरणीय डॉ. राजेश इंगोले हे असंच एक अष्टपैलू, संवेदनशील, कर्तृत्ववान आणि सामाजिक बांधिलकी जपणारं व्यक्तिमत्त्व आहे.त्यांच्या कार्याकडे पाहिलं की एका व्यक्तीचं आयुष्य दिसत नाही; दिसतो तो समाजपरिवर्तनाचा अखंड प्रवास. दिसते ती फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांची मशाल. दिसतो तो भगवान बुद्धांच्या करुणेचा मार्ग. दिसते ती माणसाला माणूस म्हणून जगविण्याची धडपड. आणि दिसतो तो अन्याय, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीय अहंकार, व्यसनाधीनता आणि सामाजिक विषमतेविरुद्ध उभा असलेला एक संघर्षशील योद्धा.**









शिका हा मंत्र केवळ ओठांवर नाही, तर कृतीत!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र-

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा!

-हा इंगोले कुटुंबीयांनी केवळ भाषणांमध्ये ठेवला नाही. तो आपल्या जीवनाच्या आचरणात उतरवला.

बहुजन समाजातील माणूस शिक्षणापासून वंचित राहिला तर त्याच्यावर पुन्हा गुलामीची सावली पडेल, याची जाणीव या कुटुंबाला होती. म्हणून घराघरांत शिक्षणाची मशाल पोहोचवण्याचं काम त्यांनी केलं.

त्यांना माहीत होतं गरिबी ही माणसाची ओळख नाही; पण शिक्षणापासून वंचित राहणं ही गरिबी कायम ठेवण्याची व्यवस्था आहे.

म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला. तू गरीब आहेस म्हणून तुझं आकाश लहान नाही, हा संदेश दिला. तुझ्या घराची परिस्थिती तुझं भविष्य ठरवत नाही; तुझी मेहनत, तुझं शिक्षण आणि तुझी जिद्द तुझं भविष्य घडवते, हा विश्वास दिला.

आज अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणाचा प्रकाश पोहोचला असेल, अनेक विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्नं पाहिली असतील, तर त्यामागे अशा असंख्य समाजधुरीणांच्या प्रयत्नांची सावली आहे.

आई-वडिलांचा वसा, मुलाने घेतलेला वारसा

आई-वडिलांनी सामाजिक परिवर्तनाची जी मशाल पेटवली, ती मशाल डॉ. राजेश इंगोले यांनी पुढे नेली. वसा फक्त वारशाने मिळत नाही; तो कृतीने सिद्ध करावा लागतो. राजेश इंगोले यांनी तो सिद्ध केला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात डॉक्टर आहे, समाजसेवक आहे, साहित्यिक आहे, लेखक आहे, समुपदेशक आहे, कलाकार आहे, क्रीडाप्रेमी आहे, लोककलेचा चाहता आहे आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे माणूसपणावर विश्वास ठेवणारा माणूस आहे. त्यांच्या कार्याची व्याप्ती पाहिली की एक प्रश्न पडतो-एक माणूस एवढ्या क्षेत्रांमध्ये एवढ्या तळमळीने काम कसं करू शकतो? पण उत्तर त्यांच्या विचारांत आहे. ज्याच्या हृदयात समाज असतो, त्याच्या कार्याला क्षेत्रांची मर्यादा राहत नाही.

जात नाही, माणूस मोठा!

भारतीय समाजाच्या छातीत हजारो वर्षांपासून जातिव्यवस्थेचा काटा रुतलेला आहे. जात माणसाला माणसापासून दूर करते. जन्माच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवते. माणसाच्या कर्तृत्वाऐवजी त्याची जात विचारते.

फुले, शाहू, आंबेडकरांनी या व्यवस्थेला प्रश्न विचारला. बुद्धांनी माणुसकीचा मार्ग दाखवला. त्याच मानवतावादी विचारधारेचा वारसा डॉ. राजेश इंगोले पुढे नेत आहेत. त्यांच्या विचारांचा गाभा आहे-

जात मोठी नाही; माणूस मोठा आहे. धर्म मोठा नाही; मानवता मोठी आहे. संपत्ती मोठी नाही; माणुसकी मोठी आहे. जातीय विष पेरण्याऐवजी मानवतेची बीजं पेरा, द्वेषाच्या भिंती उभारण्याऐवजी बंधुत्वाचे पूल बांधा, माणसाला माणसापासून तोडण्याऐवजी त्याला माणसाशी जोडा-हा त्यांच्या सामाजिक कार्याचा मूलमंत्र आहे. ही भूमिका म्हणजे केवळ विचारांची मांडणी नाही; ही सामाजिक परिवर्तनाची घोषणा आहे.

**युद्ध नको, बुद्ध हवा!**

आज जगाच्या कानाकोपऱ्यात संघर्ष, हिंसा, द्वेष आणि युद्धाची भाषा ऐकू येते. अशा काळात भगवान बुद्धांच्या करुणेचा, मैत्रीचा आणि शांततेचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. डॉ. राजेश इंगोले यांच्या विचारविश्वात म्हणूनच

युद्ध नको, बुद्ध हवा! हा संदेश ठळकपणे उमटतो. जाळण्यापेक्षा घरं उभी करा. द्वेष पसरवण्यापेक्षा प्रेम पेरा. जातीय विष पसरवण्यापेक्षा मानवतेची बीजं पेरा. माणसांना तोडण्यापेक्षा माणसं जोडण्याचं काम करा. ही भूमिका आजच्या समाजाला अत्यंत आवश्यक आहे. तीन एकर भूमीत उभा राहणारा मानवतेचा दीपस्तंभ समाजासाठी आपल्या उत्पन्नातील काही भाग दान करण्याचा विचार केवळ बोलून न दाखवता, त्याला कृतीची जोड देण्याची परंपरा इंगोले कुटुंबात दिसते. अंबाजोगाई परिसरात बौद्ध धम्माचा, मानवतावादी विचारांचा आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश पुढे नेण्यासाठी मोठ्या बौद्ध विहाराच्या निर्मितीसाठी जागा दान करण्याचा निर्णय ही त्यांच्या सामाजिक बांधिलकीची मोठी साक्ष आहे.

ती जमीन केवळ मातीचा तुकडा नाही.

ती भविष्यातील पिढ्यांच्या विचारांना आकार देणारी भूमी आहे. ती करुणेची भूमी आहे. ती समतेची भूमी आहे.ती बुद्धाच्या विचारांचा दीप पेटवणारी भूमी आहे.

नगरसेवक आणि सभापती म्हणून विकासाचा ध्यास

सामाजिक कार्याबरोबरच सार्वजनिक जीवनातही डॉ. राजेश इंगोले यांनी सहभाग घेतला. अंबाजोगाई नगरपरिषदेतील नगरसेवक व सभापती म्हणून कार्य करताना आपल्या प्रभागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. रस्ते, नाल्या, प्रकाशव्यवस्था, पाणी, घरकुल आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

त्यांच्यासाठी राजकारण म्हणजे केवळ पद, सत्ता किंवा प्रतिष्ठा नव्हे.

राजकारण म्हणजे लोकांच्या प्रश्नांसाठी उभं राहण्याचं माध्यम.

ज्यांच्या घरात छप्पर नाही, त्यांच्यासाठी घरकुल महत्त्वाचं.

ज्यांच्या वस्तीत रस्ता नाही, त्यांच्यासाठी रस्ता महत्त्वाचा.

ज्यांच्या गल्लीमध्ये अंधार आहे, त्यांच्यासाठी दिवा महत्त्वाचा.

लोकांच्या मूलभूत गरजा समजून घेऊन विकासाची कामं करण्याची ही भूमिका लोकाभिमुख सार्वजनिक जीवनाचं उदाहरण ठरते.

साहित्य, कला आणि क्रीडा क्षेत्रातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

### समाजकार्य डॉक्टर आणि पत्रकारिता

**डॉक्टर राजेश इंगोले सामाजिक कार्यकर्ते आहेत ते सामाजिक कार्य त्यांच्या मधून सुरूच आहे अनेक बिघडलेल्यांना चांगल्या मार्गाने लावण्याचे काम ते त्यांच्या रुग्णा सेवेतून करतच आहेत मात्र त्यासोबतच पत्रकारितेची नाळ त्यांच्या जुळलेली आहे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे डॉक्टर विभागाचे जे राज्याचे प्रमुख आहेत पत्रकारांच्या मोफत आरोग्य तपासणीचा उपक्रम देखील ते उत्कृष्ट पार पाडतात अशा पत्रकार डॉक्टर मित्राला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा**

डॉ. राजेश इंगोले यांचं व्यक्तिमत्त्व एका क्षेत्रापुरतं मर्यादित नाही.

साहित्य, लेखन, गायन, लोककला, संगीत, क्रिकेट, घोडेस्वारी अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.

अनेक क्षेत्रांचा अभ्यास करण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक व्यापक बनवते. ज्याचं मन विशाल असतं, त्याला जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात शिकण्यासारखं काहीतरी दिसतं. त्यामुळेच ते केवळ डॉक्टर म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील लेखक, विचारवंत आणि समाजाशी संवाद साधणारा व्यक्ती म्हणूनही ओळख निर्माण करू शकले.

**समुपदेशनातून वाचवलेली आयुष्यं**

कधी कधी एखाद्या माणसाला औषधापेक्षा दोन प्रेमळ शब्दांची गरज असते. एखाद्याच्या शरीराला उपचाराची गरज असते; पण मनाला आधाराची गरज असते.

अशा वेळी समुपदेशनाचं महत्त्व फार मोठं असतं.

डॉ. राजेश इंगोले यांनी अनेक लोकांचं समुपदेशन करून त्यांना योग्य दिशा देण्याचं काम केलं. संकटात सापडलेल्या व्यक्तीला धीर देणं, चुकीच्या निर्णयापासून परावृत्त करणं, जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास प्रवृत्त करणं-हीदेखील समाजसेवाच आहे. कधी एखाद्याला पैसा देऊन मदत करता येते; पण कधी एखाद्याला जीवनाकडे पुन्हा पाहण्याची दृष्टी देणं ही त्याहून मोठी मदत असते.

शिक्षणाची मशाल विझू देऊ नका!

बहुजन समाजाची खरी मुक्ती कुठे आहे?

उत्तर एकच-

शिक्षणात!

ज्यांच्या पिढ्या अज्ञानाच्या अंधारात ठेवण्यात आल्या, त्यांच्यासाठी शिक्षण म्हणजे सूर्य आहे. शिक्षण म्हणजे आत्मसन्मान आहे. शिक्षण म्हणजे प्रश्न विचारण्याची ताकद आहे. शिक्षण म्हणजे अन्यायाला नाही म्हणण्याचं धैर्य आहे.

### व्यसनाविरुद्ध संघर्ष

आजची युवा पिढी व्यसनांच्या विळख्यात अडकत चालली आहे. दारू, तंबाखू, अमली पदार्थ आणि इतर व्यसनं अनेक कुटुंबांची स्वप्नं राख करून टाकत आहेत. डॉ. राजेश इंगोले यांनी युवकांना व्यसनापासून दूर राहण्याचा संदेश दिला. त्यांच्या मते तरुणाईने आपल्या आयुष्याची राख व्यसनाच्या धुरात करू नये; तिने शिक्षण, कष्ट, विज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रनिर्माणाच्या मार्गावर चाललं पाहिजे.

त्यांचा संदेश स्पष्ट आहे- व्यसनाच्या नादी लागून स्वतःला संपवू नका; शिक्षणाच्या नादी लागून स्वतःला घडवा. अनेक युवकांना योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. एखादा तरुण चुकीच्या मार्गावरून परतला, एखादं कुटुंब उद्ध्वस्त होण्यापासून वाचलं, एखाद्या आईच्या डोळ्यातील अश्रू थांबले-तर त्यापेक्षा मोठं सामाजिक कार्य कोणतं?

डॉ. राजेश इंगोले हे त्या परंपरेतील एक कार्यकर्ते म्हणून आपली सामाजिक भूमिका बजावत आहेत.

माणूस वाचविण्याची चळवळ

आज समाजात माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. द्वेषाची भाषा वाढते आहे. जातींच्या नावाने भिंती उभ्या केल्या जात आहेत. धर्माच्या नावाने संघर्ष निर्माण केला जात आहे.

अशा काळात गरज आहे ती माणूस वाचविणाऱ्या चळवळीची.

डॉ. राजेश इंगोले यांच्या कार्यात ही भावना दिसून येते.

त्यांचा संघर्ष कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नसून अन्यायाविरुद्ध आहे.

त्यांचा विरोध कोणत्याही धर्माला नसून द्वेषाला आहे.

त्यांचा विद्रोह कोणत्याही समाजाविरुद्ध नसून विषमतेविरुद्ध आहे.

त्यांची भूमिका कोणत्याही जातीत माणूस शोधण्याची नसून प्रत्येक माणसात मानवता शोधण्याची आहे.

हीच त्यांच्या कार्याची खरी ताकद आहे.

पैशापेक्षा माणूस मोठा!

आजच्या भौतिकवादी युगात माणसाची किंमत अनेकदा त्याच्या संपत्तीने मोजली जाते. परंतु डॉ. राजेश इंगोले यांच्या कार्यातून वेगळा संदेश मिळतो-

पैसा कमवा, पण पैशाचा गुलाम होऊ नका.

स्वतःची प्रगती करा, पण समाजाला विसरू नका.

मोठे व्हा, पण माणुसकी लहान होऊ देऊ नका.

आपल्या ज्ञानाचा, वेळेचा, संपत्तीचा आणि सामर्थ्याचा काही भाग समाजासाठी खर्च करणं हीच खरी सामाजिक श्रीमंती आहे. एका कुटुंबाची

### रक्तातच समाजसेवेचा वारसा

डॉ. राजेश इंगोले यांच्या कार्याची मुळं त्यांच्या कुटुंबाच्या संस्कारांच्या मातीत खोलवर रुजलेली आहेत. प्राचार्य मधुकर इंगोले सर आणि आदरणीय विजयाताई इंगोले यांनी आपलं संपूर्ण आयुष्य सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी वेचलं.त्यांनी केवळ बाबासाहेबांचं नाव घेतलं नाही; तर बाबासाहेबांचा विचार जगण्याचा प्रयत्न केला.फुले-आंबेडकरी विचारधारेवर एकनिष्ठ श्रद्धा ठेवून त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचं सर्वात प्रभावी हत्यार मानलं. गरीब, वंचित आणि मागास समाजातील मुलांनी शिकावं, पुढे जावं, मोठ्या पदांवर पोहोचावं, आपल्या कुटुंबाचं आणि समाजाचं जीवन बदलून टाकावं, ही त्यांची आयुष्यभराची तळमळ होती. त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचं साधन नव्हतं; शिक्षण म्हणजे गुलामीच्या बेड्या तोडणारी तलवार होती. ज्या घराच्या दारात कधी दारिद्र्य उभं असायचं, त्या घरात शिक्षणाची ज्योत पेटवण्याचं काम त्यांनी केलं. ज्या मुलांच्या हातात परिस्थितीने मजुरीची अवजारं दिली होती, त्या हातात त्यांनी पुस्तकं दिली. ज्या डोळ्यांना भविष्य अंधारलेलं दिसत होतं, त्या डोळ्यांना त्यांनी स्वप्न पाहायला शिकवलं. म्हणूनच इंगोले कुटुंबाचं कार्य हे केवळ एका कुटुंबाचं यश नाही; ते शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या पिढ्या घडविण्याचं आंदोलन आहे.

म्हणूनच इंगोले कुटुंबाच्या कार्यातून एक संदेश पुन्हा पुन्हा उमटतो-

घराघरात डॉक्टर निर्माण झाले पाहिजेत.

घराघरात इंजिनियर निर्माण झाले पाहिजेत.

घराघरात वकील निर्माण झाले पाहिजेत.

घराघरात अधिकारी निर्माण झाले पाहिजेत.

आणि सर्वांत महत्त्वाचं-घराघरात संवेदनशील माणूस निर्माण झाला पाहिजे! कारण पद मोठं असणं पुरेसं नाही; त्या पदाचा उपयोग समाजासाठी करणं महत्त्वाचं आहे.

गरिबीविरुद्धचा खरा विद्रोह

गरिबीची थट्टा करणं सोपं आहे; पण गरिबीच्या मुळावर घाव घालणं कठीण आहे. डॉ. राजेश इंगोले यांचा संदेश आहे-कष्ट करा, शिक्षण घ्या, स्वतःला घडवा आणि पुढे गेल्यानंतर समाजाला विसरू नका.

कारण- गरिबी ही नियती नाही. दारिद्र्य हा शाप नाही.

अज्ञान हे भविष्य नाही. परिस्थिती ही अंतिम सत्य नाही.

माणूस संघर्ष करतो, शिक्षण घेतो, मेहनत करतो आणि इतिहास बदलतो.

हीच बाबासाहेबांची शिकवण होती.

फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शोषितांना शिक्षणाची दारं उघडली.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाचा झेंडा उंचावला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांना राष्ट्राच्या जीवनमूल्यांमध्ये स्थान दिलं.

भगवान बुद्धांनी करुणा, प्रज्ञा आणि मैत्रीचा मार्ग जगाला दिला.

या सर्व विचारांची सांगड घालत सामाजिक जीवन जगण्याचा प्रयत्न करणं म्हणजेच खऱ्या अर्थाने परिवर्तनाच्या वाटेवर चालणं.

कथा नव्हे, एका विचारपरंपरेची गाथा

इंगोले कुटुंबाचा प्रवास हा केवळ एका कुटुंबाच्या यशाची कहाणी नाही.

तो आहे- शिक्षणाचा प्रवास. समतेचा प्रवास. स्वाभिमानाचा प्रवास. मानवतेचा प्रवास. बुद्धाच्या करुणेचा प्रवास. फुले-आंबेडकरांच्या विचारांचा प्रवास. आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रवास.

प्राचार्य मधुकर इंगोले आणि आदरणीय विजयाताई इंगोले यांनी जी मशाल पेटवली, ती मशाल डॉ. राजेश इंगोले यांनी आपल्या कर्तृत्वाने पुढे नेली आहे. या मशालीची ज्योत एखाद्या व्यक्तीच्या हातात नाही; ती समाजाच्या भवितव्याच्या हातात देण्याचा हा प्रयत्न आहे.

क्रांती म्हणजे बंदूक नव्हे-विचार!

खरी क्रांती रक्तपातात नसते. खरी क्रांती द्वेषात नसते. खरी क्रांती माणूस जाळण्यात नसते. खरी क्रांती अज्ञान जाळण्यात आहे. खरी क्रांती जातिभेदाच्या भिंती पाडण्यात आहे. खरी क्रांती गरिबाच्या हातात पुस्तक देण्यात आहे. खरी क्रांती व्यसनाधीन युवकाला पुन्हा जीवनाच्या प्रवाहात आणण्यात आहे. खरी क्रांती रुग्णाच्या वेदनेवर उपचार करण्यात आहे. खरी क्रांती भुकेल्या माणसाच्या पोटात अन्न घालण्यात आहे. खरी क्रांती माणसाला माणूस म्हणून उभं करण्यात आहे. या अर्थाने डॉ. राजेश इंगोले यांचं कार्य ही शांत पण प्रभावी सामाजिक क्रांती आहे.

**आजच्या तरुणाईला एक जाज्वल्य संदेश**

तरुणांनो! तुमच्या हातात मोबाईल असू शकतो; पण पुस्तकही असलं पाहिजे. तुमच्या डोळ्यांत स्वप्नं असली पाहिजेत; पण त्या स्वप्नांना कष्टांची जोड असली पाहिजे. तुमच्या मनात महत्त्वाकांक्षा असली पाहिजे; पण त्याबरोबर सामाजिक बांधिलकीही असली पाहिजे. व्यसन तुमची ताकद शोषून घेईल; शिक्षण तुमची ताकद वाढवेल. वाईट संगत आयुष्य उद्ध्वस्त करेल; चांगली संगत आयुष्य घडवेल.

म्हणून- शिका! कष्ट करा! स्वतःला घडवा!

समाजासाठी उभे राहा!

देशासाठी काम करा!

आणि माणुसकीला कधीही विसरू नका!

हा संदेश डॉ. राजेश इंगोले यांच्या कार्यातून आपल्याला मिळतो.

क्रांतिकारी कार्याला सलाम!

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना केवळ एका व्यक्तीला शुभेच्छा देत नाही आहोत; तर एका विचारपरंपरेला अभिवादन करत आहोत. ज्या आई-वडिलांनी आपलं आयुष्य सामाजिक परिवर्तनासाठी खर्ची घातलं, त्या प्राचार्य मधुकर इंगोले सर आणि आदरणीय विजयाताई इंगोले यांच्या संस्कारांना सलाम! ज्या पुत्राने त्या संस्कारांची मशाल हातात घेतली, त्या आदरणीय डॉ. राजेश इंगोले यांच्या सामाजिक बांधिलकीला सलाम!

त्यांच्या वैद्यकीय सेवेला सलाम! त्यांच्या शैक्षणिक कार्याला सलाम! त्यांच्या सामाजिक कार्याला सलाम! त्यांच्या मानवतावादी भूमिकेला सलाम! त्यांच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक योगदानाला सलाम!

त्यांच्या व्यसनमुक्तीच्या प्रयत्नांना सलाम! त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्याला सलाम! आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे- माणूसपण जिवंत ठेवण्यासाठी ते करत असलेल्या संघर्षाला सलाम!

शेवटची हाक

आज समाजाला अशा माणसांची गरज आहे, जे स्वतःसाठी जगतात पण समाजासाठी उभे राहतात. अशा माणसांची गरज आहे, ज्यांच्या हातात संपत्ती असेल तर ते तिचा काही भाग समाजाला देतील; ज्ञान असेल तर ते ज्ञान वाटतील; सत्ता असेल तर ती वंचितांच्या कामी लावतील; पद असेल तर त्या पदाला लोकसेवेचं साधन बनवतील.

अशा माणसांची गरज आहे, जे सांगतील-

जात मोडा, माणसं जोडा! द्वेष सोडा, बंधुता जोडा!

अज्ञान सोडा, शिक्षण धरा! व्यसन सोडा, संघर्ष धरा!

अंधश्रद्धा सोडा, विज्ञान धरा!

युद्ध सोडा, बुद्ध धरा! हीच फुले-आंबेडकरांच्या विचारांची खरी दिशा आहे.

हीच बुद्धाच्या करुणेची वाट आहे. हीच मानवतेची मशाल आहे.

आणि हीच डॉ. राजेश इंगोले यांच्या सामाजिक कार्याची ओळख आहे.

**आदरणीय डॉ. राजेश इंगोले यांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा!**

आपल्या कर्तृत्वाची ज्योत अशीच प्रज्वलित राहो.

आपल्या हातून असंख्य गरिबांचे, वंचितांचे, विद्यार्थ्यांचे आणि पीडितांचे जीवन उजळत राहो.

आपल्या आई-वडिलांनी दिलेला सामाजिक सेवेचा वसा आणि फुले-आंबेडकरी विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत राहो.

आपलं आयुष्य असंच समाजासाठी वाहत राहो,

आपली लेखणी अन्यायाविरुद्ध लढत राहो, आपली वैद्यकीय सेवा दुःखितांच्या जखमा भरत राहो, आपली विचारांची मशाल अज्ञानाचा अंधार फाडत राहो, आणि आपल्या कार्यातून हजारो नव्या सूर्यांचा जन्म होत राहो!

**डॉ राजेश इंगोले यांना जन्मदिनाच्या हार्दिक शुभेच्छा**

जय ज्योतिबा! जय शाहू! जय भीम! नमो बुद्धाय! जय प्रबुद्ध भारत!

माणूस जिंका-जात हरवा; ज्ञान जिंका-अज्ञान हरवा; मानवता जिंका-द्वेष हरवा!

**अ‍ॅड. दिलीप दादा उजगरे**
**परळी वैजनाथ**

### वैद्यकीय सेवा : व्यवसाया-पलीकडचा माणुसकीचा धर्म

वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असताना डॉ. राजेश इंगोले यांनी आरोग्यसेवेला केवळ व्यवसाय न मानता माणुसकीची सेवा मानली.

गरिब माणूस आजारी पडला की त्याच्या हातात पैसा नसतो; पण त्याच्या डोळ्यांत जगण्याची आस असते. त्या आसवेगळ्या डोळ्यांना आधार देण्याचं काम त्यांनी केलं. अनेक गोरगरीब आणि सामान्य नागरिकांना वैद्यकीय मदत देताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. वैद्यकीय ज्ञान हे केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी नसून समाजाच्या वेदना कमी करण्यासाठी वापरलं पाहिजे, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला. कोरोना महामारीच्या काळात जेव्हा माणूस माणसापासून दूर पळत होता, जेव्हा मृत्यूची भीती प्रत्येक घराच्या दाराशी उभी होती, तेव्हा अनेक रुग्णांसाठी वैद्यकीय सेवा देण्याचं धाडस त्यांनी केलं. समाजासाठी काम करताना त्यांनाही संसर्ग झाला; तरीही त्यांनी संकटातून सावरून पुन्हा समाजकार्याचा मार्ग धरला. हीच तर खरी सेवा! स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दुसऱ्याच्या जीवासाठी धावणं म्हणजे माणुसकी.




# साखरेच्या भाववाढीत ३६ हजार कोटींचा घोटाळा :खासदार रणदीपसिंह सुरजेवाला

सणासुदीच्या काळात देशात साखरेची टंचाई निर्माण होण्याची चार महिन्यांपूर्वीच स्पष्ट शक्यता असतानाही मोदी सरकारने वेळीच उपाययोजना केल्या नाहीत. नफेखोर आणि काळाबाजार करणाऱ्यांना जनतेची लूट करण्याची संधी देत सरकारने ३६ हजार कोटी रुपयांचा घोटाळा होऊ दिला, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा खासदार रणदीपसिंह सुरजेवाला यांनी केला आहे.

देशात साखरेचा दर प्रति किलो ४५ रुपयांवरून ७० ते ७५ रुपयांपर्यंत वाढला आहे. जनतेची लूट करण्यासाठी मोदी सरकारचा हा 'मास्टरस्ट्रोक' असल्याचा आरोप सुरजेवाला यांनी केला. लोकांना मधुमेहापासून वाचविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साखर महाग केली आणि ऊस पेट्रोलमध्ये टाकला, असे भाजपचे नेते सांगत असल्याचेही ते म्हणाले. नोव्हेंबर २०२५ ते जुलै २०२६ या कालावधीत ई-२० इंधनासाठी ३२ टक्के ऊस इथेनॉल निर्मितीसाठी वापरण्यात आला. हाच ऊस साखर उत्पादनासाठी वापरला असता तर साखरेचे दर वाढले नसते, असा दावा सुरजेवाला यांनी केला. सध्या ज्यांच्याकडे साखरेचा साठा आहे,



त्यांना कोणतीही अतिरिक्त गुंतवणूक न करता किलोमागे ३० रुपयांचा फायदा होणार आहे. ऑगस्ट ते नोव्हेंबर या काळात १२० लाख टन साखरेची विक्री अपेक्षित असून, ग्राहकांना किलोमागे ३० रुपये अतिरिक्त मोजावे लागल्यास ३६ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडेल, असे त्यांनी सांगितले. २०२५-२६ च्या सुरुवातीला देशात साखरेचा शिल्लक साठा ५० लाख टन होता. मागील वर्षाच्या तुलनेत हा साठा ३० लाख टनांनी कमी होता. याच वर्षात देशात ३४३ लाख टन साखर उत्पादन होईल, असा दावा केंद्र सरकारने केला होता. मात्र प्रत्यक्षात २७५ लाख टन उत्पादन झाल्याचे इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (इस्मा) ३० एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले होते, असे सुरजेवाला यांनी सांगितले. देशात दरमहा सरासरी २४ लाख टन साखरेचा वापर होतो. ऑगस्ट ते नोव्हेंबर या सणासुदीच्या चार महिन्यांत हा वापर सरासरी ३० लाख टनांपर्यंत वाढतो. त्यामुळे या कालावधीत सुमारे १२० लाख टन साखरेची आवश्यकता भासणार आहे. टंचाईची शक्यता स्पष्ट असतानाही केंद्र सरकारने एप्रिलपासून चार महिन्यांत कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत, असा आरोप त्यांनी केला. २० ऑगस्ट रोजी ब्राझीलमधून १० लाख टन कच्ची साखर आयात करण्याचा निर्णय घेण्यात आला. ब्राझीलमधून सागरी मार्गाने साखर भारतात पोहोचण्यासाठी ४५ ते ५५ दिवस लागतील. त्यानंतर साखरेवर प्रक्रिया करण्यासाठी आणखी १५ दिवस लागतील. त्यामुळे ही साखर सणासुदीच्या काळात उपलब्ध होणार नाही. परिणामी सध्या प्रतिकिलो ७० ते ७५ रुपये असलेले साखरेचे दर आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे सुरजेवाला म्हणाले.

## ब्रोकोली लागवड माहिती : सुधारित वाण, खत व्यवस्थापन



ब्रोकोली ही फ्लॉवर वर्गातील एक उच्च पोषकमूल्य असलेली आणि बाजारात मोठी मागणी असलेली भाजी आहे. भारतामध्ये प्रामुख्याने थंड हवामानात (ऑक्टोबर ते मार्च) याची यशस्वी लागवड केली जाते.लागवडीसाठी आवश्यक बाबी : हवामानथंड हवामान (१५ ते २५ तापमान). जमीनचांगल्या निचऱ्याची मध्यम ते भारी जमीन (सामू ६.० ते ६.५). सुधारित वाण -रोयल ग्रीन, फिएस्टा, लकी, ग्रीन मॅजिक. बियाण्यांचे प्रमाण३०० ते ४०० ग्रॅम प्रति हेक्टर. लागवडीचे अंतरओळींत ६० सेमी आणि रोपांमध्ये ४५ सेमी

रोपवाटिका व्यवस्थापन : रोपे २५ ते ३० दिवसांत तयार होतात.गादीवाफ्यावर बियाणे पेरून रोपे तयार करा. रोपांचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी ५०% शेडनेटचा वापर करावा.

जमीन तयारी व खत व्यवस्थापन : जमिनीची सेंद्रिय ताकद वाढवा. शेताची २-३ वेळा उभी-आडवी नांगरणी करून २-३ ट्रॉली चांगले कुजलेले शेणखत मातीत मिसळा. वाफे किंवा सर्या तयार करताना १५०:८०:८० किलो प्रति हेक्टरी प्रमाणात रासायनिक खते द्या. पुनर्लागवड : संध्याकाळच्या वेळी लागवड करणे योग्य. ४ ते ५ पाने आलेली (२५-३० दिवसांची) रोपे तयार केलेल्या वाफ्यावर ठरवलेल्या अंतरावर लावावीत. पुनर्लागवडीनंतर लगेचच हलके पाणी द्यावे. पाणी व आंतरमशागत : ठिबक सिंचन अत्यंत प्रभावी ठरते. जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पिकात तण होणार नाही याची काळजी घ्या आणि गरजेनुसार १-२ वेळा खुरपणी करून रोपांना मातीची जोड द्या.काढणी व उत्पादन : पुनर्लागवडीनंतर ६० ते ८० दिवसांत पीक तयार. ब्रोकोलीचे गड्डे पूर्ण घट्ट असताना आणि पिवळे पडण्यापूर्वी धारदार चाकूने कापून घ्यावेत. प्रति हेक्टरी १२ ते १५ टन उत्पादन मिळते.

## 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून ६ ते ८ कोकरांना देतात जन्म

मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारित जातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

'अविशान' ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी 'अविशान' जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात.

अविशान मेंढ्यांचा इतिहास : अविशान मेंढ्यांचा क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला. परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात ''अविशान'' जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.

केवळ ५ टक्के मृत्युदर :: अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकू शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.



## कापूस पिकावरील तुडतुडे आणि फुलकिड्यांचे नियंत्रण

राज्यातील अनेक भागांत कपाशीचे पीक पाते लागण्याच्या आणि फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. मात्र पावसाची उघडीप आणि ढगाळ हवामानामुळे कपाशीवर तुडतुडे आणि फुलकिड्यांचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. या रसशोषक किडींचे वेळीच नियंत्रण न केल्यास पिकाची वाढ खुंटून उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळीच पिकामध्ये एकात्मिक उपाययोजना करुन कपाशी पिकाचे रक्षण करावे.

तुडतुडे : तुडतुड्यांची पिल्ले आणि प्रौढ पानांच्या खालच्या बाजूला राहून रस शोषतात. त्यामुळे सुरुवातीला पानांच्या कडा पिवळसर पडतात. पुढे त्या तपकिरी होऊन पाने वाटीसारखी आतल्या बाजूला आकसतात. प्रादुर्भाव वाढल्यास पाने वाळून गळतात, झाडाची वाढ खुंटते आणि कळ्यांची गळ होऊ शकते.

फुलकिडे : फुलकिड्यांची पिल्ले फिकट पिवळ्या रंगाची, तर प्रौढ पिवळसर ते फिकट तपकिरी रंगाचे असतात. हे कीटक केवळ १ ते २ मिलिमीटर आकाराचे असतात. ते पानांचा पापुद्रा खरवडून रस शोषतात. त्यामुळे पानांवर पांढुरके किंवा चंदेरी



चट्टे दिसतात. याला 'सिल्वरिंग' असे म्हणतात. प्रादुर्भाव वाढल्यास पाने सुरकुततात, आकसतात आणि वळतात.चिकट सापळे : कपाशी पिकाची नियमित पाहणी करणे महत्त्वाचे आहे. तुडतुडे आणि फुलकिड्यांचा प्रादुर्भाव सुरुवातीच्या अवस्थेत आढळल्यास पिवळे आणि निळे चिकट सापळे वापरता येतात. यासाठी १.५ बाय १ फूटवर हेक्टरी १५ ते २० चिकट सापळे लावावेत. हे सापळे पिकाच्या सुमारे १ फूट उंचीवर लावावेत. प्रत्येक पानावर २ ते ३ तुडतुडे किंवा १० फुलकिडे आढळत असतील आणि पानांच्या कडा मुरगळलेल्या, पिवळसर झालेल्या किंवा पानांवर सिल्वरिंग दिसत असेल, तर रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. यासाठी फ्लोनिकॅमिड ५० टक्के डब्ल्यूजी १५० मिलि प्रति ५०० लिटर पाणी किंवा बुप्रोफेझिन २५ टक्के एससी १००० मिलि प्रति ५०० ते ७५० लिटर पाणी किंवा टोलफेनपायरॅड १५ टक्के ईसी १००० मिलि प्रति ५०० लिटर पाणी किंवा डायनोटेफ्युरॉन २० टक्के एसजी १२५ ते १५० ग्रॅम प्रति ५०० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

प्रादुर्भाव रोखण्यासाठी : कपाशीचे शेत तणमुक्त ठेवावे. युरिया आणि डीएपीसारख्या नत्रयुक्त खतांचा वापर संतुलित प्रमाणात करावा. शेतातील जुनी धसकटे आणि पिकांचे अवशेष वेळेत बाहेर काढून नष्ट करावेत. या उपायांमुळे तुडतुडे आणि फुलकिड्यांचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होते.




### महत्वाच्या घटना

७०८ : ७०८ई.पुर्व : जपानमध्ये पहिल्यांदा तांब्याची नाणी बनवली गेली. (पारंपारिक जपानी तारीख: १० ऑगस्ट ७०८)
१४९८ : वास्को द गामाने कालिकतहुन पोर्तुगालला परतण्याचा निर्णय घेतला.
१८२५ : पोर्तुगालने ब्राझिलच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८३१ : मायकेल फॅरेडे याने विद्युत चुंबकीय प्रवर्तनाचा शोध लावला.
१८३३ : युनायटेड किंगडमने आपल्या साम्राज्यात गुलामगिरीवर बंदी घातली.
१८९८ : गुडईयर कंपनीची स्थापना झाली.
१९१८ : लोकमान्य टिळक यांनी मुंबई येथे काँग्रेसचे विशेष अधिवेशन बोलावले.
१९४७ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीचे अध्यक्ष झाले.
१९६६ : द बीटल्स यांनी शेवटचा स्टेज शो केला.
१८९८ : 'गुडईयर' कंपनीची स्थापना झाली.
१९७४ : चौधरी चरणसिंग यांनी 'भारतीय लोक दल' या राजकीय पक्षाची स्थापना केली.
२००४ : मायकेल शुमाकर यांनी पाचव्यांदा फॉर्मुला वन ड्राईव्हर्स चॅम्पियनशिप जिंकले.
२०१३ : राष्ट्रीय क्रीडा दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८० : नव-अभिजात फ्रेंच चित्रकार ज्याँओगूस्ट डोमिनिक अँग्र यांचा जन्म.
१८३० : आर्जेन्टिनाचे राष्ट्रपिता हुआनबॉतिस्ता अल्बेर्डी यांचा जन्म.
१८६२ : ऑस्ट्रेलियाचे वे५ पंतप्रधान अँड्रु फिशर यांचा जन्म.
१८८७ : भारतीय डॉक्टर आणि राजकारणी जीवराज नारायण मेहता यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९७८)
१८८० : लोकनायक माधव श्रीहरी तथा 'बापूजी' अणे. (मृत्यू: २६ जानेवारी १९६८). पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय शिक्षणतज्ज्ञ, स्वातंत्र्यसेनानी, आधुनिक संस्कृत कवी आणि राजकारणी
१८८७ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रख्यात चिकित्सक व देशसेवक तसचं, गुजरात राज्याचे पहिले मुख्यमंत्री सेवक जीवराज मेहता यांचा जन्मदिन.
१९०१ : पद्मश्री विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील सहकारमहर्षी (मृत्यू: २७ एप्रिल १९८०)
१९०५ : मेजर ध्यानचंद हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध असलेले भारतीय सुवर्णपदक विजेता हॉकीपटू (मृत्यू: ३ डिसेंबर १९७९)
१९१५ : इन्ग्रिड बर्गमन स्वीडीश अभिनेत्री (मृत्यू: २९ ऑगस्ट १९८२)
१९२३ : रिचर्ड ॲटनबरो इंग्लिश निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते
१९४९ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय अवकाश वैज्ञानिक व भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रो चे प्रमुख व माजी अध्यक्ष, तसचं अवकाश आयोगाचे माजी अध्यक्ष, के. राधाकृष्णन यांचा जन्मदिन.
१९५८ : मायकेल जॅक्सन जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतलेखक, संगीतकार, निर्माता, आणि अभिनेता (मृत्यू: २५ जून २००९)
१९५९ : दक्षिण भारतीय चित्रपट अभिनेता अक्किनेनी नागार्जुन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३३ : पेरूचा शेवटचा इंका राजा अताहु आल्पा यांचे निधन.
१७८० : पंथीयन चे सहरचनाकार जॅकजर्मन सोफ्लॉट यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १७१३)
१८९१ : सायकल चे शोधक पियरे लेलेमेंट यांचे निधन. (जन्म: २५ ऑक्टोबर १८४३)
१९०४ : ओट्टोमन सम्राट मुराद (पाचवा) यांचे निधन.
१९०६ : बाबा पद्मनजी मुळे ख्रिस्ती धर्मप्रसारक, ग्रंथकार व मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक (जन्म: ? मे १८३१)
१९६९ : मेहबूब हुसेन पटेल ऊर्फ 'शाहीर अमर शेख' लोकशाहीर (जन्म: २० आक्टोबर १९१६)
१९७५ : इमॉन डी व्हॅलेरा आयर्लंड प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १४ आक्टोबर १८८२)
१९७६ : काझी नझरुल इस्लाम स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक व हिंदु मुस्लिम ऐक्याचे समर्थक असलेले बंगाली कवी. पश्चिम बंगालमधील असनसोल-दुर्गापूर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला त्यांचे नाव देण्यात येणार आहे. (जन्म: २५ मे १८९९)
१९८२ : इन्ग्रिड बर्गमन स्वीडीश अभिनेत्री (जन्म: २९ ऑगस्ट १९१५)
१९८६ : गजानन श्रीपत तथा 'अण्णासाहेब' खेर महाराष्ट्रीयन मराठी शिक्षणतज्ज्ञ व पुणे येथील महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक तसचं, पुणे विद्यार्थी गृहाचे संस्थापक सदस्य (जन्म: १५ जून १८९८)
२००७ : बनारसी दास गुप्ता ब्रिटीश राजवटील प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र सेनानी, भारतीय राजकारणी व हरियाणा राज्याचे माजी चौथे मुख्यमंत्री (जन्म: ५ नोव्हेंबर १९१७)
२००८ : जयश्री गडकर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी आणि मराठी चित्रपट अभिनेत्री (जन्म: २१ फेब्रुवारी १९४२)

शनिवार दि.२९ ऑगस्ट २०२६ ५



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत



# जामखेड शहर व तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती

## पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड शहर व तालुक्यात सध्या दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून प्रमुख तलाव, बंधारे व पाण्याचे स्रोत झपाट्याने कोरडे पडत आहेत. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण होण्याची शक्यता असून प्रशासनाने आतापासूनच ठोस नियोजन करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली. जामखेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भुतवडा तलावातील पाणीसाठा येत्या काही दिवसांत संपण्याची शक्यता असल्याने शहराच्या पर्यायी पाणीपुरवठ्याचे तातडीने नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली. त्याचबरोबर तालुक्यातील ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांमध्येही पाणीटंचाई निर्माण होण्यापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.याबाबत गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. निवासी नायब तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांच्याकडे हे निवेदन सुपूर्द करण्यात आले.



प्रशासनाने जामखेड शहर व तालुक्यासाठी पाणीटंचाई निवारण आराखडा तयार केला आहे काय, याची माहिती जनतेसमोर जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. आराखडा सार्वजनिक केल्यास त्यामध्ये आवश्यक सुधारणा किंवा अतिरिक्त उपाययोजनांबाबत नागरिक व लोकप्रतिनिधींना सूचना करता येतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. शहरासाठी पर्यायी पाणीपुरवठ्याबरोबरच ग्रामीण भागासाठी गावनिहाय टंचाई आराखडा तयार करून आवश्यक ठिकाणी टँकर, विहीर अधिग्रहण, नवीन विंधन विहिरी, पाईपलाईन आदींचे प्रस्ताव तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत, अशी मागणी करण्यात आली. पाणीटंचाईमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन पीक नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी आवश्यक यंत्रणा व मनुष्यबळाची पूर्वतयारी आतापासूनच करावी, तसेच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता लक्षात घेऊन चारा डेपो किंवा चारा छावणी सुरू करण्यासाठी आवश्यक आराखडा तयार करावा, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी प्रशासनाने टंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्याऐवजी आतापासूनच नियोजन करण्याची गरज व्यक्त केली. मागील टंचाईच्या काळात आमदार रोहितदादा पवार यांच्या माध्यमातून प्रशासनाची वाट न पाहता वाड्या-वस्त्यांवर पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले जात होते. मात्र एका वर्षी हे टँकर अडवण्यात आले. शासकीय टँकर देताना नियम-अटी पुढे केल्या जातात आणि लोकप्रतिनिधी स्वतःच्या माध्यमातून जनतेसाठी पाणी उपलब्ध करून देत असेल तर त्यालाही आडकाठी आणली जाते, अशी टीका त्यांनी केली. ''यावर्षी पाणीटंचाई निवारणाची जबाबदारी शासन आणि प्रशासनानेच पार पाडावी. आमदार रोहितदादा पवार यांच्याकडे आवश्यक ती मदत योग्य वेळी मागू; मात्र शासनाची जबाबदारी शासनानेच पार पाडली पाहिजे,'' अशी भूमिका गोलेकर यांनी व्यक्त केली. प्रशासनाने मागण्यांची गांभीर्याने दखल न घेतल्यास येत्या आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर, मंगेश आजबे, शरद शिंदे, सुरेश भोसले, सुनील कोठारी, प्रशांत राळेभात, रामहरी गोपाळघरे, बापुसाहेब कार्ले, अभय शिंगवी, सुनील उगले, बाळासाहेब खैरे, अनिल रेडे, कुंडल राळेभात, आदी उपस्थित होते.

---

# तलाठी कार्यालय आणि पोलीस इमारतीसाठी अजूनही खरवंडीकरांसाठी तारीख पे तारीख !



पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील भटक्या पंढरीतील ऊस तोडणी कामगारांच्या पट्ट्यातील खरवंडी कासार हे दळणवळण व्यापारी क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे उपनगर असून येथे मात्र नेहमी दरोडे चोऱ्या रस्ते लुटमार आणि अनेक गंभीर गुन्हे घडत असून सुद्धा गेल्या दहा वर्षांपासून खरवंडी कासार हे उपनगर नवीन पोलीस इमारत आणि नवीन पोलीस स्टेशन मंजुरीच्या प्रतीक्षेत असूनही खरवंडीकरांसाठी तारीख पे तारीख असल्याने लोकप्रतिनिधी आमदार मोनिका राजळे आपण नवीन तलाठी कार्यालय व नवीन पोलीस प्रशासकीय इमारत निर्मितीसाठी गांभीर्याने विचार व प्रयत्न करण्याची गरज आहे तर दुसरीकडे महसूल विभागाच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि गोरगरीब लोकांच्या महसुली दप्तरीच्या कामकाजामुळे तब्बल २५ ते ३० किलोमीटर वरून भालगाव खरवंडी ते पाथर्डी असा प्रवास

### आ.मोनिका राजळे तुम्ही भगवानगड परिसराच्या पालक आहात,लक्ष द्या !

वर्षानुवर्ष दुर्लक्षित राहिलेल्या खरवंडी कासार येथील नवीन कामगार तलाठी कार्यालय व पोलीस प्रशासकीय इमारतीसाठी तुम्ही पुढाकार घ्यावा असे भाजप सहकार आघाडीचे वामन कीर्तने हे मागणी करत आहेत किमान भाजप पक्षातील तुमच्या कार्यकर्त्यांच्या मागणीला न्याय द्यावा अशी अपेक्षा आहे.

येथील ऊसतोड मजूर कामगारांना करावा लागत आहे नागरिकांना महसुली प्रशासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या सेवा ऑनलाईन पद्धतीने मिळाव्यात जमिनीची नोंद विहिरीची नोंद सातबारा आठ अ उतारे अशा विविध प्रकारच्या सेवा आणि इतर तलाठ्यांच्या मार्फत होणारी कामे ही दहा ते पंधरा दिवस रखडले जातात यामुळे लोकांच्या महसुली दप्तरीच्या कामकाजासाठी त्यांना सरकारी काम आणि पाच महिने थांब अशा पद्धतीने थांबावे लागते यामुळे खरवंडी कासार हे मध्यवर्ती उपनगर असल्याने जवळपास दहा ते पंधरा गावचा महसुली कारभार कामगार तलाठी कार्यालयातून चालतो परंतु येथे मात्र सरकारी प्रशासकीय इमारत नसल्याने महसुली अधिकारी कर्मचाऱ्यांसह लोकांची गैरसोय होत असल्याने लोकप्रतिनिधी आमदार मोनिका राजळे यांनी विशेष लक्ष घालून खरवंडी कासार येथे नवीन पोलीस स्टेशन निर्मिती नवीन पोलीस प्रशासकीय इमारत आणि कामगार तलाठी कार्यालय मंजूर करावे व येथील नागरिकांची गैरसोय दूर करावी अशी मागणी भगवानगड परिसरातील नागरिकांनी केली आहे.

---

# भिलवडेत भगवाननगरला सिंगल फेज वीज देण्याची मागणी

## महावितरण कार्यालयात आंदोलनाचा इशारा ?

पाथर्डी। प्रतिनिधी

भिलवडे ग्रामपंचायत हद्दीतील भगवाननगर वस्तीवर गेल्या अनेक वर्षांपासून वीज पुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे वारंवार पाठपुरावा करूनही महावितरण प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने ग्रामपंचायत सदस्या पार्वती भिमराज बडे आणि भिलवडे गावचे युवा नेतृत्व योगेश बडे आक्रमक झाले आहेत येत्या आठ ते दहा दिवसांत या वस्तीचा सर्व्हे करून सिंगल फेज वीज उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने स्पष्ट लेखी आश्वासन दिले नाही तर येत्या ९ सप्टेंबर २०२६ रोजी महावितरणच्या पाथर्डी कार्यालयात थेट धडक आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे पाथर्डी येथील उपमुख्य कार्यकारी अभियंता अरविंद कुकडे यांना प्रत्यक्ष भेटून सुपूर्द करण्यात आले भगवाननगर वस्तीवर सुमारे २५ ते ३० कुटुंबे वास्तव्यास असून आजही या ग्रामस्थांना मूलभूत अशा सिंगल फेज वीज पुरवठ्यापासून वंचित राहावे लागत आहे येथील नागरिकांना शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या थ्री-फेज विजेवरच आपली दैनंदिन कामे भागवावी लागतात थ्री-फेज विजेच्या लहरीपणामुळे घरातील उपकरणे जळणे रात्रीच्या वेळी अचानक अंधार पसरणे आणि लहान मुलांच्या शिक्षणात खंड पडणे अशा अनेक गंभीर समस्यांना ग्रामस्थांना तोंड द्यावे लागत आहे यापूर्वी महावितरण विभागाकडे अनेकदा पाठपुरावा करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही त्यामुळे संतप्त झालेल्या पार्वती बडे व योगेश बडे यांनी आता स्वतः मैदानात उतरून महावितरण प्रशासनाला शेवटचा इशारा दिला आहे हे निवेदन देताना मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्यासह भिलवडे गावातील नागरिक उपस्थित होते महावितरणाचे उपअभियंता अरविंद कुकडे यांनी येत्या १० दिवसांत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी आणि सिंगल फेज विजेबाबत ठोस लेखी आश्वासन द्यावे अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.



---

# तिलोक जैन विद्यालयात बी.आय.एस.क्लब स्टँडर्ड रायटिंग कॉम्पिटिशन उत्साहात संपन्न

पाथर्डी। प्रतिनिधी

श्री तिलोक जैन विद्यालयात केंद्र सरकारच्या अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालय या खात्या अंतर्गत बी.आय.एस.क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे भारत की आजादी का अमृत महोत्सवनिमित्त देशातील प्रत्येक राज्यात शासना मार्फत सदर क्लब माध्यमिक शाळा महाविद्यालय तसेच इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये स्थापन करण्यात आलेले होते श्री तिलोक जैन विद्यालयात गेल्या पाच वर्षापूर्वी एस.सी.८९२ क्रमांकाचा क्लब स्थापन करण्यात आलेला आहे या क्लब अंतर्गत सध्या देशभर स्टँडर्ड रायटिंग कॉम्पिटिशनचे आयोजन केले जात आहे.



या अनुशंगाने भारतीय मानक ब्युरो पुणे शाखेचे स्टँडर्ड प्रमोशन ऑफिसर हर्षमोहन शुक्ला क्लबचे मेंटॉर सुनील कटारिया कोमेंटॉर संध्या पालवे यांच्या मार्गदशनाखाली विद्यालयातील या क्लब मधील जवळपास ८४ विद्यार्थ्यांनी स्टँडर्ड रायटिंग स्पर्धेत सहभाग नोदवला या मध्ये विद्यार्थ्यांनी ग्राहकांची बाजारात कुठेही फसवणूक होणार नाही स्टॅण्डर्ड म्हणजे नेमके काय या अनुशंगाने पेन्सिल या उत्पादनावर आधारीत स्टॅण्डर्ड बनवून त्याचे सादरीकरण केले भारतीय मानक ब्युरो () हे भारतातील सर्व उत्पादकांच्या उत्पादनांना आय.एस.आय.मार्क सर्टिफिकेशन देते भारतीय उत्पादनांचे मानांकन ठरवते त्याचप्रमाणे इंडस्ट्रियल लायसन्स अँप्रोव्हड करते क्लब स्थापनेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना समाजातील नागरीकांना स्टँडर्डस किंवा मानांकनाचे महत्व कळावे तसेच मेक इन इंडिया अंतर्गत सर्व प्रकारच्या कच्चा व पक्या मालाचे उत्पादन भारतातच व्हावे हा आहे याचप्रमाणे बाजारातील आय.एस.ओ. किंवा आय .एस.आय.मार्क. हॉलमार्किंग उत्पादने खरेदी करतो यामध्ये ग्राहक म्हणून भारतीय नागरिकांची फसवणूक होऊ नये हा आहे यावेळी व्यासपीठावर प्राचार्य अजय भंडारी शिक्षक उद्धव चन्ने जब्बार पठाण महेंद्र राजगुरू सुधाकर सातपुते राजेंद्र भुजबळ हेमंत नागरे कमलेश मुथ्था सुनिल कटारिया यांनी संध्या पालवे उपस्थित होते शितल कुलकर्णी यांनी सर्वांचे स्वागत केले.

---

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ६०३/२०२६**

**अॅड. एम. आर. उबाळे**

**संगिता भ्र.शिवाजी कानधरे व इतर वि. निरंक**

अर्जदार : १. संगिता भ्र. शिवाजी कानधरे, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुर्ला ता.जि.बीड २. हनुमान पि. शिवाजी कानधरे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ३. अश्विनी भ्र. शरद घोडके, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोळदगांव ता.जि.बीड

विरुध्द गैरअर्जदार निरंक

प्रकरणः- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी शिवाजी पि. विश्वनाथ कानधरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत शिवाजी पि. विश्वनाथ कानधरे हे दिनांक १५/०८/२०२५ रोजी शिवकमल हॉस्पीटल, बीड ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. मयतास अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे शिवाजी पि. विश्वनाथ कानधरे रा. कुर्ला ता.जि.बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०१/१०/२०२६ आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन,

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

# झाडावर बांधली राखी; दिघोळमध्ये अनोख्या रक्षाबंधनातून वृक्षसंवर्धनाचा संदेश!

## क्रांती क्लबचा स्तुत्य उपक्रम; २०२५ मध्ये लावलेल्या वृक्षांचे संरक्षण करण्याचा घेतला संकल्प

जामखेड । प्रतिनिधी

रक्षाबंधन म्हणजे भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम आणि संरक्षणाचा सण. मात्र, दिघोळ येथे क्रांती क्लबच्या सदस्यांनी या सणाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत एक वेगळाच आदर्श निर्माण केला. रक्षाबंधनाच्या निमित्ताने झाडांना राखी बांधून त्यांचे संरक्षण करण्याचा अनोखा संदेश क्रांती क्लबच्या वतीने देण्यात आला.क्रांती क्लब दिघोळच्या वतीने २०२५ मध्ये परिसरात वृक्षारोपण करण्यात आले होते. वृक्षारोपण करून केवळ फोटो काढणे किंवा कार्यक्रमापुरते पर्यावरणप्रेम न दाखवता, लावलेल्या वृक्षांचे संगोपन आणि संरक्षण करण्याचा निर्धार क्लबच्या सदस्यांनी केला आहे. याच भावनेतून रक्षाबंधनाच्या दिवशी या वृक्षांना राखी बांधण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

क्रांती क्लबचे ज्येष्ठ सदस्य अप्पासाहेब कासार व सुनील क्षीरसागर यांच्या हस्ते वृक्षाला राखी बांधून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी झाडाला राखी बांधत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. 'ज्याप्रमाणे बहीण आपल्या भावाच्या हातावर राखी बांधून त्याच्या संरक्षणाची अपेक्षा करते, त्याचप्रमाणे झाडेही मानवाच्या जीवनाचे रक्षण करतात. त्यामुळे झाडांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे,' हा भावनिक आणि सामाजिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला. आज मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असताना केवळ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी पूर्ण होत नाही. लावलेल्या प्रत्येक रोपट्याचे संगोपन करून ते मोठे होईपर्यंत त्याची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. क्रांती क्लबने याच विचारातून २०२५ मध्ये लावलेल्या वृक्षांशी आपले नाते जोडत त्यांना राखी बांधली. या उपक्रमात रत्नाकर लावंड, दत्ता कोचाळे, काशिनाथ होनमाने, हनुमान खुणे, बापू पाचणकर, बाबा पेंटर, आकाश दगडे, नवनाथ गिते, श्रीराम खाडे आदी सदस्य उपस्थित होते. झाडांना राखी बांधण्याच्या या उपक्रमात क्रांती क्लबचे सदस्य श्री. बाबा पेंटर यांनी अग्रणी सहभाग घेतला. त्यांच्या पुढाकाराने क्लबच्या सर्व सदस्यांनी एकत्र येत पर्यावरण संवर्धनाचा हा आगळावेगळा संदेश जनतेसमोर ठेवला. सण-उत्सव हे केवळ परंपरा जपण्यासाठी नसून त्यातून समाजाला सकारात्मक संदेशही देता येतो, हे क्रांती क्लबने या उपक्रमातून दाखवून दिले. रक्षाबंधनाच्या सणाला वृक्षसंवर्धनाची जोड देणारा हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, झाडे लावा, झाडे जगवा आणि झाडांचे रक्षण करा'



---

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीडच्या खेळाडूंनी ऑलिम्पिक पदकाचे स्वप्न पाहावे:हरिष धार्मिक

बीड। प्रतिनिधी

हॉकीचे जादूगर महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या २९ ऑगस्ट या जन्मदिवसाचे औचित्य साधून बीड जिल्ह्यातील खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होत भारताला पदक मिळवून द्यावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या वतीने २८ ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.शासनाच्या धोरणानुसार क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करणे, शहरी व ग्रामीण भागात खेळाचे महत्त्व पोहोचवणे आणि युवकांमध्ये क्रीडाविषयक सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी या विशेष उपक्रमांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात अपर जिल्हाधिकारी श्री. धार्मिक यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी उपस्थित खेळाडूंना श्री. धार्मिक यांच्यासह शिवछत्रपती पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके आणि राज्य तायक्वाँदो असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. उद्घाटन सोहळ्यानंतर हॉकी, फुटबॉल, क्रिकेट, बॉक्सिंग, वुशू, सॉफ्टबॉल आणि बेसबॉल या स्पर्धांना सुरुवात झाली. तसेच, सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी क्रीडा प्रशिक्षण केंद्रात नियमित सराव करणाऱ्या खेळाडूंना पाहुण्यांच्या हस्ते ट्रॅक सूट, टी-शर्ट, शॉर्ट्स आणि शुज अशा 'स्पोर्ट्स किट'चे वाटप करण्यात आले. या सोहळ्यास जिल्हा हॉकी संघटनेचे अध्यक्ष प्रा. दिनकर थोरात, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, ज्येष्ठ संघटक उत्तरेश्वर सपाटे, शेख अझहर, शेख अफरोज, निसार तांबोळी, मोहसीन शेख, सुनील वाघमारे, विजय अपसिंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील, सतीश राठोड, रेवणनाथ शेलार, जितेंद्र आराक, धनेश करांडे, गणेश वीर आणि दिनकर चर्के यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आमदार सुरेश धस यांचा विकासाचा झंझावात सुरूच!

## कडी-कांबळी धरणांसह कालवा दुरुस्तीसाठी ९ कोटी १७ लाखांचा निधी मंजूर; ७९५ हेक्टर क्षेत्राला मिळणार सिंचनाचा लाभ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जुन्या कडी व कांबळी धरणांच्या दुरुस्तीबरोबरच त्यांच्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ९ कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार सुरेश धस यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर निधी मंजूर झाला असून, या दुरुस्तीमुळे कालव्यांच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या कामामुळे सुमारे ७९५ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत ही कामे करण्यात येणार आहेत. अनेक वर्षांपासून जुने झालेले हे प्रकल्प तसेच कालव्यांमधून मोठ्या प्रमाणात होणारी पाणीगळती यामुळे उपलब्ध पाणी शेवटच्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नव्हते. त्यामुळे दुरुस्तीची मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने केली जात होती.

कांबळी प्रकल्पासाठी ३ कोटी ४६ लाखांचा निधी

धानोरा गावाजवळील कांबळे प्रकल्पाचे बांधकाम १९५८ मध्ये करण्यात आले होते. या प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र ५०.२५० चौरस किलोमीटर असून, साठवण क्षमता २.०७७ दशलक्ष घनमीटर आणि उपयुक्त पाणीसाठा २.०५ दशलक्ष घनमीटर आहे. धरणाची लांबी १,५०० मीटर, तर सांडव्याची लांबी २७७.४० मीटर आहे. जुना प्रकल्प असल्याने धरण तसेच कालव्यातून मोठ्या प्रमाणावर पाणीगळती होत होती. परिणामी धानोरा, साबळखेड, शिरपूर आणि कडा परिसरातील शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात सिंचनाचे पाणी मिळत नव्हते.



कांबळी प्रकल्पाचे लाभक्षेत्र १,१०२ हेक्टर, लागवडीलायक क्षेत्र १,०४७ हेक्टर, तर सिंचन योग्य क्षेत्र ९७२ हेक्टर आहे. या प्रकल्पाला ९.६६ किलोमीटर लांबीचा डावा कालवा आहे. धरण व कालवा दुरुस्तीसाठी ३ कोटी ४६ लाख ५६ हजार ७८७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

कडी मध्यम प्रकल्पालाही मिळणार नवसंजीवनी

कडी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम सुमारे सहा दशकांपूर्वी झाले असून, जुन्या दगडी बांधकामामुळे धरण आणि कालव्यांमध्ये पाणीगळतीची समस्या निर्माण झाली होती. सध्या केवळ सुमारे पाच किलोमीटरपर्यंत कालव्याद्वारे पाणी पोहोचत असल्याने शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

कडी मध्यम प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र ९६.२०० चौरस किलोमीटर असून, साठवण क्षमता ७.५८ दशलक्ष घनमीटर आणि उपयुक्त पाणीसाठा ६.३३ दशलक्ष घनमीटर आहे. धरणाची लांबी ६९७ मीटर असून सांडव्याची लांबी १५० मीटर आहे. या प्रकल्पाचे लाभक्षेत्र १,३१७ हेक्टर असून लागवडीलायक क्षेत्र १,२९० हेक्टर आणि सिंचन योग्य क्षेत्र १,०८४ हेक्टर आहे. दुरुस्तीच्या कामामुळे कालव्याची वहन क्षमता वाढून ३९५ हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. कडी मध्यम प्रकल्प धरण व कालवा दुरुस्तीसाठी ५ कोटी ६९ लाख ९० हजार ३३७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचण्याची आशा

दोन्ही प्रकल्पांच्या दुरुस्तीमुळे पाण्याची गळती कमी होऊन कालव्यांची वहन क्षमता वाढणार आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होऊन कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचण्यास मदत होणार आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनाला मोठा आधार मिळणार असून, दुष्काळी परिस्थितीत सिंचनाच्या दृष्टीने हा निधी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या निधीसाठी आमदार सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याने कडी व कांबळी

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. निधी मंजूर केल्याबद्दल आमदार धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

या महत्त्वपूर्ण कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात सहकार्य केल्याबद्दल राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, राज्याचे जलसंपदा मंत्री ◀◀ पान २ वर

# पाटोदा शहरातील शाळा परिसर व बसस्थानकावर छेडछाड प्रतिबंधक पथकाची गस्त वाढवा

### महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे पोलिसांना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहर आणि परिसरातील ग्रामीण भागांतून दररोज हजारो विद्यार्थी व विद्यार्थिनी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षणासाठी येतात. शाळा सुटण्याच्या व भरण्याच्या वेळी विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येत असून, रोडरोमिओंचा उपद्रव रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी पाटोदा शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या प्रमुखांनी केली आहे. या संदर्भात पोलीस निरीक्षक, पाटोदा पोलीस स्टेशन यांना संयुक्त



निवेदन देण्यात आले.

प्रमुख मागण्या:

शाळा परिसरात गस्त: सकाळी ९.३० ते दुपारी ३.४५ या वेळेत शहरातील प्रत्येक शाळा व कॉलेज परिसरात छेडछाड प्रतिबंधक पथकाची (छेडीमार पथक) नियमित फेरी आयोजित करावी.

बसस्थानकावर पोलीस बंदोबस्त: ग्रामीण भागातून ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी पाटोदा बसस्थानकावर दररोज सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत एक महिला व एक पुरुष पोलीस कर्मचारी तैनात ठेवावेत. विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता यावे यासाठी पोलीस प्रशासनाने तात्काळ नियोजित वेळेत गस्त घालून रोडरोमिओंचा कडक बंदोबस्त करावा, अशी आग्रही विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर वसंतदादा पाटील ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अधिकारीपदी निवड झालेल्या रसिका देशमुख व स्वप्नाली देशमुख यांचा मोहन जगताप यांच्या हस्ते सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत कु. रसिका सुरेशराव देशमुख आणि कु. स्वप्नाली सुधीरराव देशमुख यांनी अधिकारीपदाला गवसणी घालत माजलगावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शुक्रवार,दि. २८ ऑगस्ट रोजी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप यांच्या संपर्क कार्यालयात



विशेष सत्कार करण्यात आला.

मोहनराव जगताप यांच्या हस्ते दोन्ही गुणवंत विद्यार्थिनींचा शाल,श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.यावेळी उपस्थितांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना मोहनराव जगताप म्हणाले,ग्रामीण भागातील मुलींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगा सारख्या कठीण आणि अत्यंत स्पर्धात्मक परीक्षेत यश संपादन करून अधिकारीपद मिळवणे ही केवळ त्यांच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण माजलगाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे.या दोन्ही कन्यांनी आपल्या कर्तृत्वाने माजलगावचे नाव उज्ज्वल केले आहे.त्यांचे यश ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थिनींना 'आपणही अधिकारी होऊ शकतो'असा आत्मविश्वास देणारे आहे.

जिद्द,मेहनत आणि सातत्याला पर्याय नाही,हे रसिका आणि स्वप्नाली यांच्या यशाने सिद्ध केले आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीला ◀◀ पान २ वर

# रक्षाबंधनाची अनोखी भेट: बीड पोलिसांकडून नागरिकांना चोरीस गेलेले दागिने व मुद्देमाल परत

बीड । प्रतिनिधी

रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त नागरिकांची हक्काची व कष्टाची मालमत्ता परत मिळवून देत बीड जिल्हा पोलिसांनी नागरिकांना एक अनोखी व भावनिक भेट दिली आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून आणि संवेदनशील नेतृत्वाखाली राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेअंतर्गत विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हस्तगत केलेले सोन्या-चांदीचे दागिने, मौल्यवान मुद्देमाल आणि हरवलेले मोबाईल फोन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

पोलीस अधीक्षकांचा पुढाकार

पोलीस आणि सर्वसामान्य नागरिकांमधील विश्वासाचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना



निर्देश दिले होते. गुन्ह्यांच्या तपासादरम्यान जप्त झालेला आणि ठाण्यात पडून असलेला मुद्देमाल तातडीने कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर संबंधित नागरिकांना परत करण्याचे आदेश त्यांनी दिले होते.

पोलीस ठाणेनिहाय करण्यात आलेली कामगिरी:

शिवाजीनगर पोलीस ठाणे: राजीव गांधी चौक येथील राहत्या घरातून चोरीस गेलेले तब्बल ३ लाख ३७ हजार २८० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने पोलिसांनी तपासादरम्यान हस्तगत केले होते. तसेच बीड बसस्थानकात गर्दीचा फायदा घेऊन चोरीला गेलेले २८ हजार ९८५ रुपयांचे सोन्याचे मिनी गंठणही जप्त करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते हे दागिने दोन्ही महिलांना ◀◀ पान २ वर

# बनकरंजा येथे अक्षय मुंदडा यांच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे बनकरंजा येथे विविध विकासकामांचा भव्य लोकार्पण सोहळा शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय, बनकरंजा येथे आयोजित करण्यात आला आहे. हा लोकार्पण सोहळा पनोपेश्वर साखर कारखाना (पानगाव) चे चेअरमन अक्षय मुंदडा यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे.

गावातील नागरिकांच्या सोयीसाठी आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध निधींमधून मंजूर झालेल्या महत्त्वपूर्ण कामांचे लोकार्पण या वेळी करण्यात येणार आहे.

लोकार्पण होणारी विकासकामे व निधी:

बनकरंजा ते चिंचपूर रोडवर पूल: ६० लक्ष

आमदार स्थानिक निधी (२०२५-२६) अंतर्गत सभामंडप: २० जिल्हा वार्षिक योजना (२०२५-२६) बंधारा: २० लक्ष

स्मशानभूमी, बनकरंजा: १५ लक्ष

अंगणवाडी, बनकरंजा: ११.२५ लक्ष

अंगणवाडी (कुंभारवाडा), बनकरंजा: ११.२५ लक्ष

शाळा खोली, बनकरंजा: १० लक्ष

शाळा दुरुस्ती, कुंभारवाडा: ०४ लक्ष

या सोहळ्याचे आयोजन सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच समस्त ग्रामस्थ मंडळ बनकरंजा (ता. केज, जि. बीड) यांच्या वतीने करण्यात आले असून गावातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# माजलगाव आगारात पाच राजमाता जिजाऊ बसेस दाखल, आ.सोळंके यांच्या हस्ते पुजन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील आगाराच्या मागणीनुसार अत्याधुनिक राजमाता जिजाऊ पाच बसेसची पूर्तता झाली असून या पाच अत्याधुनिक राजमाता जिजाऊ बस दि २७ ऑगस्ट रोजी माजलगाव आगारात दाखल झाल्या असुन पाच अत्याधुनिक जिजामाता बसचे पुजन आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले.



माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी अत्याधुनिक राजमाता जिजाऊ बसेसमुळे प्रवाशांचा सुरक्षित, आरामदायी आणि अधिक सुविधाजनक प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.माजलगाव आगार येथे या पाच बसेसचे विधिवत पूजन आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते करून लोकार्पण करण्यात आले.दि २८ ऑगस्ट शुक्रवार पासून अत्याधुनिक राजमाता जिजाऊ बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल होत असून ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ होण्यास यामुळे निश्चितच मदत होणार असल्याचे मत आ.प्रकाश सोळंके यांनी केले.

# महादेव आरसूळ मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

रायमोहा । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील येवलवाडी येथे रस्त्याच्या कारणावरून महादेव आरसुळ यांना मारहाण केली. त्यांना ब्लेड मारून जखमी केले. याप्रकरणी चौघांवर पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की येवलवाडी शिवारात रस्त्यावरून जात असताना महादेव आरसुळे यांना नवनाथ येवले, नितीन येवले, राम तांबे,नटराज तांबे या चौघांनी रस्त्यात अडवून या रस्त्यावरून जाऊ नकोस म्हणून धमकी दिली. त्याच्यावर ब्लेडने वार केले आणि शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी महादेव आरसुळ यांच्या फिर्यादीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात कलम ११५ (२), ११८ (१), ३(५), ३५१(२ ),३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास आहे हेका. रवींद्र उबाळे हे करीत आहेत.

# लोकनेते सुंदरराव सोळंके पतसंस्थेतर्फे २२.५० लाखांचा लाभांश

## भविष्यात सभासदांना अधिकाधिक लाभांश देणार : चेअरमन वीरेंद्र सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्या., माजलगावच्या आर्थिक प्रगतीत सभासदांचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत, भविष्यातही संस्थेच्या माध्यमातून सभासदांना जास्तीत जास्त लाभांश देण्याचा प्रयत्न राहणार आहे,असे संस्थेचे चेअरमन वीरेंद्र प्रकाश सोळंके यांनी सांगितले. संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्ह व्यवहाराला प्राधान्य देत सभासदांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवले आहे.



आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेला २ कोटी २४ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, त्यातून सभासदांना १० टक्के लाभांश, म्हणजेच २२ लाख ५० हजार रुपयांची रक्कम त्यांच्या बचत खात्यात जमा करण्यात आली आहे. सध्या संस्थेकडे १५० कोटी रुपयांच्या ठेवी असून, १०२ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच मागील पाच वर्षांपासून संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग मिळत आहे. या भक्कम आर्थिक कामगिरीमुळे संस्थेवरील सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. संस्थेच्या प्रगतीशील वाटचालीत आमदार प्रकाश सोळंके व सौ. मंगलाताई सोळंके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असून, त्याचबरोबर संचालक मंडळाचे ही सातत्यपूर्ण व मोलाचे मार्गदर्शन संस्थेला मिळत आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि सभासदहिताला प्राधान्य देत उल्लेखनीय प्रगती साधली असून, भविष्यातही संस्थेच्या विकासासाठी हे ◀◀ पान २ वर

# गोरक्षनाथ टेकडी येथे सप्ताह सांगता प्रसंगी लाखोंचा जनसागर

## किसान बाबा व नवनाथ बाबा यांच्या सारखे गुरु शिष्य पुन्हा होणे नाही:- ह.भ.प. संजय महाराज पाचपोर

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरू ह.भ.प.वै. किसन बाबा महाराज यांच्या २८ व्या पुण्यस्मरणानिमित्त ह.भ.प. गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता दि. २८ ऑगस्ट शुक्रवार रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ह.भ.प. संजयजी महाराज पाचपोर रामायणाचार्य बुलढाणा यांच्या काल्याच्या कीर्तनाने लाखोच्या जनसमुदायात संपन्न झाली



श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सदगुरू ह.भ.प.वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त पहाटे गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते किसन बाबा यांच्या समाधीचे पूजन साधू बाबा, गोरक्षनाथ व दत्तगुरु यांची आरती करण्यात आली. त्यानंतर प्रथेप्रमाणे गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा भाविक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाली. अभंग विवेचन करताना पाचपोर महाराज पुढे म्हणाले की जगामध्ये सर्वश्रेष्ठ गुरु मच्छिंद्रनाथ व त्यांचे शिष्य गुरु गोरक्षनाथ हे आहेत आणि हाच वारसा पुढे सदगुरू वैकुंठवासी किसन बाबा महाराज व त्यांचे शिष्य शांतिब्रह्म गुरु नवनाथ बाबा महाराज यांनी पुढे चालवला, मच्छिंद्रनाथ आणि गोरक्षनाथानंतर कलियुगामध्ये गुरु किसन बाबा व शिष्य नवनाथ बाबा यांच्यासारखे गुरु शिष्य या कलियुगात पुन्हा होणे नाही असे अभंग विवेचनांमध्ये ह.भ.प. संजय महाराज पाचपोर म्हणाले. गोरक्षनाथ टेकडी येथे लाखोच्या जनसमुदायांनी काल्याचे कीर्तनाचा लाभ तसेच महाप्रसादाच्या महापंक्तीचा भाविक भक्ताने लाभ घेतला यावेळी सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.मनोज जरांगे पाटील, खासदार बजरंग सोनवणे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, डॉ. ज्योतीताई मेटे, ओमप्रकाश शेटे, यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते ◀◀ पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26